दैनिक राज्य लोकतंत्र
www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com
बीड – महाराष्ट्र वर्ष – ५ अंक–५६ गुरूवार दि.६ जून २०२४ RNI No.: MAHMAR/2021/85884 NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 • पाने– ६ किंमत ३ रूपये

संपादकीय

काँग्रेसच्या कम बॅकने भाजपचे सिंहासन डळमळीत!

भाजपसाठी अत्यंत भरवशाच्या मानल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेश व त्यापाठोपाठ महाराष्ट्रात 'इंडिया' आघाडीने जो जबरदस्त धक्का दिला त्याने भाजपच्या मोठ्या बहुमतासह तिसऱ्यांदा सत्ता स्थापनेचा फुगा पुरता फुटला. भाजपला स्वबळावर बहुमत प्राप्त करण्यापासून रोखण्यात 'इंडिया' आघाडीने विशेषत: काँग्रेसने रोखले आहे. काँग्रेसने भाजपला दिलेल्या जोरदार दणक्याने मागच्या निवडणुकीत एकट्याने ३०३ जागांवर विजय प्राप्त करणारा भाजप २५० जागांच्या आत आला आहे.

केजरीवालांचा पाय खोलात, न्यायालयीन कोठडी वाढली

नवी दिल्ली । वृतसंस्था

राउस एवेन्यू कोर्टाने बुधवारी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची मेडिकल आधारावर देण्यात येणारी जामीन याचिका फेटाळली. दिल्ली अबकारी धोरण प्रकरणी कोर्टाने त्यांची न्यायालयीन कोठडी १९ जूनपर्यंत वाढवली आहे. केजरीवाल यांना व्हर्चुअली कोर्टमध्ये हजर करण्यात आले. या प्रकरणात डिफॉल्ट जामीन मिळण्यासाठी केलेल्या अरविंद केजरीवाल यांच्या अर्जावर दिल्ली कोर्ट ७ जून रोजी सुनावणी करणार आहे.

देशात यंदा ३२८८.५२ लाख टन अन्नधान्य उत्पादन!

» केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाकडून अंदाज जाहीर

पुणे । प्रतिनिधी

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाने वर्ष २०२३–२४ साठी प्रमुख कृषी उत्पादनांचा तिसरा आगाऊ अंदाज जाहीर केला आहे. ज्यात यावर्षी देशातील एकूण अन्नधान्य उत्पादन ३२८८.५२ लाख टन होईल, असा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. हे उत्पादन, वर्ष २०२२–२३ मधील धान्य उत्पादनापेक्षा किंचित कमी आहे. दरम्यान, गेल्या ५ वर्षांत (वर्ष २०१८–१९ ते २०२२–२३ मध्ये) झालेल्या ३०७७.५२ लाख टन सरासरी अन्नधान्य उत्पादनापेक्षा यावर्षी

२११.०० लाख टन अधिक धान्य उत्पादन होणार आहे.

गेल्या कृषी वर्षापासून, उन्हाळी हंगाम रब्बी हंगामापासून विलग करण्यात आला असून, तो तिसऱ्या आगाऊ अंदाजामध्ये समाविष्ट करण्यात आला आहे. म्हणून, लागवडीखालील क्षेत्र, उत्पादन आणि उत्पन्नाच्या या आगाऊ अंदाजामध्ये खरीप, रबी आणि उन्हाळी या तिन्ही हंगामाचा समावेश करण्यात आला आहे. प्रामुख्याने राज्य कृषी

» या आधारे अंदाज व्यक्त

खरीपातील पीक उत्पादनाचे अंदाज तयार करताना, पीक कापणी प्रयोगांवर (सीसीईएस) आधारित उत्पन्न देखील विचारात घेतले आहे. आधीच्या अंदाजांसह, वर्ष २०२३–२४ च्या तिसऱ्या आगाऊ अंदाजाचे तपशील ॅिसि.सीं.ळप येथे उपलब्ध आहेत. याशिवाय हा अंदाज तयार करताना, वातावरणाची स्थिती, पूर्वीचे कल, दरातील चढ–उतार, बाजार समित्यांमध्ये कृषी उत्पादनांची आवक इत्यादी घटक देखील विचारात घेण्यात आले आहेत.

◀◀ पान २ वर

जरांगे फॅक्टरची जादु; मराठवाड्यात ८ पैकी ७ मराठा खासदार

माधवं फॅक्टरची ताकद कमी पडली; संभाजीनगर, बीड, परभणीत ओबीसींना धक्का

अशोक खाडे । प्रतिनिधी

राजकारणात दिवंगत गोपीनाथ मुंडे यांनी माधवं फॅक्टर सुरु करुन त्याची जादु राज्यभर दाखवून दिली होती. सध्या त्याच माधवं फॅक्टरची ताकद बीड, परभणी आणि संभाजीनगरमध्ये कमी पडल्याने ओबीसींना येथे मोठा धक्का बसला. तर जरांगे फॅक्टर मराठवाड्यात अपेक्षेप्रमाणे प्रभावी ठरला असल्याने ८ पैकी ७ मराठा खासदार झाले आहेत. बीडमध्ये पंकजा मुंडे, संभाजीनगरात चंद्रकांत खैरे आणि परभणीत महादेव जानकर या ओबीसींच्या दिग्गज नेत्यांना पराभवाचा सामना करावा लागला आहे. हा पराभव ओबीसींच्या चांगलाच जिव्हारी लागल्याचे दिसते.

मराठा आरक्षण आंदोलनाच्या माध्यमातून मनोज जरांगे हे नाव संपुर्ण महाराष्ट्राला कळले. समाजाने जरांगे यांचे नेतृत्व मान्य करीत त्यांना आंदोलनामध्ये पाठींबा दिला. पुढे जरांगे यांनी मराठा समाजाच्या मागण्या लावून धरल्या. यादरम्यान ओबीसी समाजाला आपले आरक्षण सुरक्षित नसल्याची भावना झाल्याने मनोज जरांगे यांच्या मागण्यांना विरोध होऊ लागला. छगन भुजबळ आणि जरांगे यांच्यातील ◀◀ पान २ वर

संभाजीनगरात विरोधाचा पॅटर्न बदलला

संभाजीनगर मतदारसंघात चंद्रकांत खैरे हे ओबीसी पण ठाकरे गटाचे उमेदवार होते. इम्तियाज जलील हे मुस्लिम व एमआयएमचे उमेदवार होते. तर संदिपान भुमरे हे मराठा व शिंदे शिवसेनेचे उमेदवार होते. या मतदारसंघात जरांगे फॅक्टरने ठाकरे किंवा मुस्लिम समाजाचा उमेदवार म्हणून खैरे आणि जलील यांच्या पाठीशी राहिला नाही तर दुरचा मामा संदिपान भुमरे यांच्या बाजूने कौल दिला. आपला माणूस ओळखा असा संदेश त्यावेळी सोशल मिडीयावर फिरत होते. भाजप व मित्रपक्षांना असलेला विरोधाचा पॅटर्न जरांगे फॅक्टरने संभाजीनगरात बदलला आणि भुभरे यांना निवडूण आणले.

अजित पवारांचे नाराज आमदार परतीच्या वाटेवर?

१० आमदारांचा सुप्रिया सुळेंना मेसेज

मुंबई: लोकसभेच्या निकालानंतर आता राज्यात राजकीय भूकंप येण्याची शक्यता असून पहिला भूकंप हा अजित पवारांच्या राष्ट्रवादीत येण्याची चिन्हं आहेत. बारामतीमधून सुप्रिया सुळे निवडून आल्यानंतर त्यांच्या अभिनंदनाच्या निमित्ताने अजित पवारांच्या दहा आमदारांनी त्यांना शुभेच्छा संदेश पाठवला आहे. हे दहा आमदार शरद पवारांच्या संपर्कात असल्याची माहिती सूत्रांनी दिली. त्यामुळे विधानसभेच्या आधी अजितदादांसोबत गेलेले आमदार आता शरद पवारांसोबत येणार का हे पाहावे लागेल.

अजित पवारांच्या नाराज आमदारांनी सुप्रिया सुळेंना संदेश पाठवले आहेत. आमदारांनी अभिनंदनपर संदेश करत सुप्रिया सुळेंशी संपर्क साधायचा प्रयत्न केला असल्याची माहिती समोर आली आहे. यामुळे अजित पवारांचे नाराज आमदार परतीच्या वाटेवर आहेत का अशा चर्चा सुरु झाल्या आहेत. किमान १० आमदारांनी परतीसाठी पवार गटाच्या नेत्यांशी संपर्क साधल्याची माहिती मिळत आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे कर्जत जामखेडचे आमदार रोहित पवार यांनी देखील अजित पवारांच्या समर्थक आमदारांबाबत एक मोठे वक्तव्य केले होते. सुनील तटकरे आणि धनंजय मुंडे काही आमदारांना घेऊन भाजपमध्ये जातील असा दावा त्यांनी केला ◀◀ पान २ वर

फडणवीसांच्या राजीनाम्याच्या वक्तव्यानंतर भाजपमध्ये भूकंप

कार्यकर्त्यांकडून मनधरनी सुरू

मुंबई । प्रतिनिधी

देवेंद्र फडणवीसांनी बुधवारी (दि.५) दुपारी उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याचे जाहीर केल्याने भाजपमध्ये तीव्र पडसाद उमटू लागले आहेत. त्यांनी राजीनामा देऊ नये, यासाठी भाजप महिला मोर्चा आणि कार्यकर्ते सागर बंगल्याबाहेर जमा होऊ लागले आहेत. कार्यकर्त्यांनी घोषणा देऊन त्यांची मनधरणी करण्याचे प्रयत्न केले. दरम्यान, भाजपचे प्रदेशाध्यक्ष यांनी कार्यकर्त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला.

राज्यातील भाजपच्या पराभवाची जबाबदारी घेत उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याची तयारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दाखवली आहे. यासाठी केंद्रीय नेतृत्वाकडे उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा देण्याची परवानगी मागितली आहे. नेतृत्वाने परवानगी दिली तर पूर्णवेळ विधानसभा निवडणुकीचा प्रचार करता येईल, असे त्यांनी बुधवारी पत्रकार ◀◀ पान २ वर

लोकसभा निकालाचा परिणाम विधानसभा निवडणुकीत दिसेल

पक्ष फुटले तरी त्यांच्या जागा जास्त आल्या: पंकजा मुंडे

मुंडेंशी माझे शत्रुत्व नाही, हे फक्त राजकाण–सोनवणे

लोकसभा निवडणुकीत आम्ही पुर्ण ताकदीने लढलो आणि जिंकलो. त्यामुळे आमचे पंकजा मुंडे किंवा इतरांशी शत्रुत्व नाही, ते फक्त राजकारण होते, अशी प्रतिक्रिया बीडचे खा. बजरंग सोनवणे यांनी दिली.

» जिल्हाधिकाऱ्यांनी १५०० पोस्टल मतदान मोजलेच नाही

पंकजा मुंडे आणि सोनवणे यांच्यातील मतांची आघाडी–पिछाडी पाहायला मिळाली. अखेर, या निवडणुकीत बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांनी बजरंग सोनवणे यांना विजयी घोषित केले. त्यामुळे यावेळी गोंधळ निर्माण झाला होता. पंकजा यांनीही बीडमध्ये जाऊन मतमोजणी केंद्रावर पाहणी केली होती. तेव्हा नेमके काय घडले, याची माहिती पंकजा मुंडेंनी दिली. जिल्हाधिकाऱ्यांनी १५०० पोस्टल मतं मोजलीच नाहीत, अशी माहितीही त्यांनी दिली. प्रत्येकाला मतदानाचा अधिकार आहे, तो पाहता ते १५०० मतं मोजलेच पाहिजे, अशी आमची मागणी होती. पण, तीही मतं मोजण्यात आली नाही, ती पाकिटं तशीच ठेवण्यात आली. दोन पाकिटं क्षुल्लक कारणं देत उघडलीच नाहीत, असेही पंकजा मुंडेंनी बोलताना सांगितले.

बीड । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीच्या निकालाचा परिणाम हा निश्चितपणे महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणुकीत पाहायला मिळेल. लोकसभेच्या निकालांमुळे समोरच्यांचा आत्मविश्वास वाढणार आहे. महाराष्ट्राच्या राजकारणात एक संस्कृती आहे की, रडीचा डाव खेळू नये. जे पक्ष फुटले, त्यांची संख्या जास्त आली. त्यामुळे त्यांचा आत्मविश्वास वाढेल, असे वक्तव्य बीड लोकसभा मतदारसंघातील भाजपच्या पराभूत उमेदवार पंकजा मुंडे यांनी केले. त्या बुधवारी बीडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होत्या. यावेळी पंकजा मुंडे यांनी उमद्या मनाने ◀◀ पान २ वर

नरेंद्र मोदींनी दिला पंतप्रधानपदाचा राजीनामा

नवी दिल्ली । वृतसंस्था

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी दुपारी पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला. कॅबिनेटच्या बैठकीत लोकसभा विसर्जित करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला होता. हा प्रस्ताव राष्ट्रपतींकडे सादर केल्यानंतर राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी पंतप्रधानपदाचा राजीनामा मंजूर केला आहे. नवीन सरकार येईपर्यंत ते काळजीवाहू पंतप्रधान असतील.

लोकसभा निवडणुकीत एनडीएला २९२ तर इंडिया आघाडीला २३४ जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे देशात पुन्हा एनडीएची सत्ता येणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानुसार बुधवारी पंतप्रधान मोदींच्या अध्यक्षतेखाली कॅबिनेटची बैठक झाली. बैठकीत लोकसभा विसर्जित करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला. प्रस्तावाला कॅबिनेटने मंजूरी दिल्यानंतर हा प्रस्ताव राष्ट्रपतींकडे सादर करण्यात आला. त्याला राष्ट्रपतींनीही मंजूरी दिली. राष्ट्रपतींनी राजीनामा मंजूर केल्यानंतर मोदींना काळजीवाहू पंतप्रधान म्हणून काम करण्याची विनंती केली.

बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.०५ जून २०२४

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

	किमान	कमाल	सरासरी
गहू : १०.५० क्विंटल			
	२,२४१	२,८००	२,४६०
ज्वारी/हायब्रिड : ९२.०० क्विंटल			
	१,७४०	२,९३६	२,२९२
मूग : १.५० क्विंटल			
	५,००१	७,१००	६,०५०
तूर : २.५० क्विंटल			
	९,००१	११,४००	१०,३५०
उडीद : ९.५० क्विंटल			
	२,३३२	२,६००	२,४४४
बाजरी: ३.५० क्विंटल			
	१,८००	२,४००	२,१००
चिंच/लोकल: ४७.०० क्विंटल			
	१,७००	६,३००	४,०००
सोयाबीन: ५०.५० क्विंटल			
	४,०००	४,५११	४,३७०
हरभरा: १९.५० क्विंटल			
	५,८००	६,६०१	६,२६३

एनडीएच्या नेतेपदी मोदींची निवड

राष्ट्रपतींनी दिली वेळ, उद्या सत्तास्थापनेचा करणार दावा

नवी दिल्ली । वृतसंस्था

लोकसभा निवडणुकीत बहुमताचा आकडा पार पडल्यानंतर आता एनडीएकडून सत्तास्थापनेच्या हालचाली सुरु झाल्या आहेत. बुधवारी दिल्लीत झालेल्या एनडीएच्या बैठकीत

नरेंद्र मोदी यांची एनडीएच्या नेतेपदी निवड करण्यात आली आहे. आता सत्तास्थापनेचा दावा करण्यासाठी ◀◀ पान २ वर

इंडिया आघाडीच्या बैठकीत ठरली रणनिती

जनादेश मोदींच्या आणि भाजपाच्या विरोधात–खर्गे

नवी दिल्ली। वृतसंस्था

२०० हून अधिक जागा मिळविलेल्या इंडिया आघाडीची पुढील दिशा ठरवण्यासाठी बुधवारी दिल्ली मध्ये बैठक झाली. यावेळी इंडिया आघाडीच्या नेत्यांनी सरकार स्थापनेची शक्यता, युतीची भविष्यातील रणनीती आणि माजी सहयोगी नितीश कुमार आणि एन. चंद्राबाबू नायडू यांच्यापर्यंत पोहोचायचे की नाही यावर महत्त्वपूर्ण चर्चा झाली. लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या नवी दिल्लीतील निवासस्थानी या नेत्यांची बैठक झाली.

या बैठकीत काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खर्गे म्हणाले की, जनादेश निर्णायकपणे नरेंद्र मोदींच्या विरोधात, ◀◀ पान २ वर

राज्यात दोन दिवसात मान्सून

पुणे हवामान वेधशाळेचा अंदाज, ७ तारखेला बहुतांश भागात कोसळणार

पुणे । प्रतिनिधी

काही दिवसांपूर्वी मान्सून केरळात दाखल झाल्यानंतर महाराष्ट्रात कधी दाखल होणार अशी विचारणा सातत्याने करण्यात येत होती. या पार्श्वभूमीवर पुणे हवामान वेधशाळेने अंदाज व्यक्त केला असून, आगामी दोन दिवसात मान्सून दाखल होण्यास वातावरणीय परिस्थिती अनुकूल आहे. तर कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रात पावसाचे आमगन होणार असल्याचा अंदाज पुणे वेधशाळेने व्यक्त केला आहे.

रायगड, रत्नागिरी, सिंधूदूर्ग, पुणे, कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, अहमदनगर आणि आजूबाजूच्या परिसरात आणि मराठवाडा व इतर काही ठिकाणी विजेच्या कडकडटासह पाऊस कोसळणार असल्याचा अंदाजही हवामान वेधशाळेने व्यक्त केला आहे. त्याचबरोबर

दक्षिण भारत आणि गोव्यातही पावसाचे आगमण होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे. तर कोकण आणि गोव्यात गुरूवारी किंवा शुक्रवारी पावसाची ◀◀ पान २ वर

अग्रलेख

काँग्रेसच्या कम बॅकने भाजपचे सिंहासन डळमळीत!

भाजपसाठी अत्यंत भरवशाच्या मानल्या जाणाऱ्या उत्तर प्रदेश व त्यापाठोपाठ महाराष्ट्रात 'इंडिया' आघाडीने जो जबरदस्त धक्का दिला त्याने भाजपच्या मोठ्या बहुमतासह तिसऱ्यांदा सत्ता स्थापनेचा फुगा पुरता फुटला. भाजपला स्वबळावर बहुमत प्राप्त करण्यापासून रोखण्यात 'इंडिया' आघाडीने विशेषत: काँग्रेसने रोखले आहे. काँग्रेसने भाजपला दिलेल्या जोरदार दणक्याने मागच्या निवडणुकीत एकट्याने ३०३ जागांवर विजय प्राप्त करणारा भाजप २५० जागांच्या आत आला आहे. तर काँग्रेस ९९ जागांवर पोहोचली आहे. उत्तर प्रदेशात इंडिया आघाडीने रालोआला दणका देताना चाळीशी पार केल्याने भाजप थेट तिशीत पोहोचला. यामुळे रालोआ या निवडणुकीत 'चारसौ पार' तर लांबच पण 'तीनसौ पार' होतानाही अडखळले

भाजपचे सर्वांत जास्त वस्त्रहरण झाले आहे ते महाराष्ट्रात. मागच्या निवडणुकीत शिवसेनेच्या साक्षीने ४८ पैकी ४१ जागांवर विजय मिळविणारा भाजप राज्यात केलेल्या फोडाफोडीच्या राजकारणानंतर या निवडणुकीत स्वत: ९ जागांवर सीमित झाला आहे. याचाच अर्थ महाराष्ट्रातील मतदारांनी भाजपच्या फोडाफोडीच्या व सूडाच्या राजकारणाला साफ नाकारले आहे. एकनाथ शिंदे व अजित पवारांच्या बंडखोरीला व पक्षावर ताबा मिळविण्याच्या कृत्यालाही मतदारांनी अजिबात थारा दिला नाही. निवडणूक एकतर्फी नव्हे तर अत्यंत अटीतटीची झाली व 'इंडिया' आघाडीने भाजपच्या सर्व फंड्यांवर मात करून भाजपचे पुरते गर्वहरण केले असल्याचे स्पष्ट झाले आहे. 'इंडिया' आघाडी भाजपला सत्तेवरून दूर करण्यास मात्र यशस्वी ठरली नसल्याचे मान्य करावे लागते. मात्र त्याच वेळी 'इंडिया' आघाडीने भाजपचे पुरते गर्वहरण करून त्यांना जमिनीवर आणले आहे. त्यामुळे मोदी-शहा या भाजपच्या अजेय मानल्या जाणाऱ्या जोडीला केवळ रोखताच नव्हे तर पराभूतही करता येते हा आत्मविश्वास काँग्रेससह सर्व विरोधी पक्षांना प्राप्त झाला आहे. त्यामुळे आता देशातील राजकारणाची दिशा येत्या काळात बदलणार आहे. अर्थातच त्याची सुरुवात महाराष्ट्रातून होईल कारण महाराष्ट्रातील विधानसभा निवडणूक आता तोंडावर आहे.

लोकसभा निवडणुकीत राज्यातील महाविकास आघाडीने भाजपच्या नेतृत्वाखालील महायुतीला पुरता धोबीपछाड दिला आहे. त्यामुळे आपल्या समर्थकांना टिकविण्याचे कडवे आव्हान एकनाथ शिंदे व अजित पवार यांच्यासमोर आहे. तर आपल्या पक्षातील निष्ठावंतांची नाराजी दूर करण्याचे आवाहन भाजपच्या नेत्यांसमोर असणार आहे. त्यामुळे आता महाराष्ट्रात राजकीय उलटफेरीचा 'तिसरा अंक' सुरू होण्याची शक्यता आहे. त्याचा येत्या विधानसभा निवडणुकीतील राजकीय समीकरणांवर मोठा परिणाम होणे अटळ आहे. थोडक्यात देशात व महाराष्ट्रातही जोरदार कमबॅक करून काँग्रेसने भाजपचे अत्यंत भक्कम वाटणारे सिंहासन डळमळीत केले आहे. काँग्रेसने या वेळी इंडिया आघाडीच्या ऐक्यासाठी मोठ्या त्यागाची भूमिका घेत देशभरात ३१८ जागांवर लढण्याचा निर्णय घेतला होता. त्या वेळी अशी भूमिका घेऊन काँग्रेस भाजपला सत्तेवरून पायउतार कशी करेल? अशी शंका राजकीय तज्ज्ञांकडून व्यक्त झाली होती. त्यात नक्कीच तथ्य असल्याचे निकालातून दिसून आले. मात्र ज्या ३१८ जागा काँग्रेसने लढविल्या त्या अत्यंत महत्त्वाच्या होत्या. कारण त्यातील बहुतांश जागांवर काँग्रेसची थेट भाजपशी लढत होती व याच जागा भाजपचे स्वबळ घटविण्यासाठी महत्त्वाच्या होत्या. ३०३ वरून २३९ जागांवर आलेला भाजपा व ५३ वरून ९९ जागांवर पोहोचलेली काँग्रेस पाहता काँग्रेसने आपली कामगिरी अत्यंत चांगल्या प्रकारे बजावून भाजपचा फुगा पुरता फोडला, असेच म्हणावे लागेल. रालोआच्या साधारण बहुमतासह भाजपने केंद्रातील सत्ता टिकविली तरी या तिसऱ्या टर्ममध्ये भाजपसमोर संख्याबळाने व आत्मविश्वासानेही भरपूर असलेल्या विरोधकांचे कडवे आव्हान आणि अंकुश असणार आहे. देशातील मतदारांनी सजगतेने मतदान करून लोकशाहीत हव्या असलेल्या सशक्त विरोधकांच्या अंकुश निर्मितीला बळ दिले त्याबद्दल मतदारांचे अभिनंदन करावे लागेल.

बियाणांची साठेबाजी करून कृत्रिम टंचाई-राजेंद्र आमटे

बीड । प्रतिनिधी

पाऊस पडल्यामुळे शेतकरी बियाणे खरेदी करण्यासाठी बाजारात फिरत आहे अनेक व्यापारी बाजार पेठेत बियाणे उपलब्ध असताना शेतकऱ्यांना बियाणे संपले म्हणून वापस पाठवतात अनेक व्यापारी बियाणांची साठेबाजी करून बाजारात कृत्रिम टंचाई निर्माण करत आहेत नंतर तेच बियाणे जास्तीच्या भावाने विक्री केली जाते साठेबाजी करून कृत्रिम टंचाई निर्माण करणाऱ्या व्यापाऱ्याची गोडवणे तपासा अन्यथा शिवसंग्राम शेतकरी आघाडी हि शेतकऱ्यांना गोडवून मध्ये बियाणे वाटप करेन याची दक्षता कृषी अधिकारी व विभागाने घ्यावी बाजारात होणारी बियाणांची होणारी साठेबाजी थांबून शेतकऱ्यांना बियाणे उपलब्ध करून देण्यात यावी तसेच अनेक व्यापारी बाजारात तुलसी कंपनीची कब्बडी, ऍग्रो सिड्स कंपनीचे ७०६७ अशा बियाणांची विक्री ८६४ रू किंमतीची बॅग हि बाराशे, तेराशे रुपये किमतीने कळ्या बाजारात विक्री केली जात आहे कळ्या बाजारात होणारी विक्री तत्काळ थांबवा अशी मागणी शिवसंग्राम शेतकरी आघाडीच्या वतीने जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, सुनील कुटे, राजू सय्यद, रमेश जगताप, लाटे तात्यासाहेब, मोहन गव्हाणे, संपत गव्हाणे, शरद तीपले, विलास मस्के, शैलेश सुरवासे, सचिन आमटे यांनी केली.

गोदी मिडीयाला मतदारांचा झटका

नरेंद्र मोदी आणि त्यांच्यामुळे भाजपची आज जी दुर्गती झालीय त्यानं देशातील जे काही आत्मे दु:खी झाले आहेत त्यात ''गोदी मिडिया'' चे आमचे काही मित्र देखील आहेत. काल सकाळी सुरूवातीला निकालाचे कल जेव्हा भाजपच्या बाजुनं येत होते,तेव्हा गोदी मिडियाच्या अँकरचे आवाज टिपेला गेलेले होते. त्यांना आनंदाच्या उकळ्या फुटत होत्या. नंतर हे आवाज क्षीण होत गेले. थोडं थांबा, येत्या काही दिवसात हे आवाजही तुम्हाला ऐकू येणार नाहीत. कारण दहा वर्षात पत्रकारितेचा दुरूपयोग करीत, जनतेच्या प्रश्नांकडे पुर्ण दुर्लक्ष करीत गोदी मिडियानं केवळ एका व्यक्तीच्या आरत्या उतारण्यात धन्यता मानली. त्यानिमित्तानं देशात नुसता उच्छाद मांडला होता. त्याचा फटका देशातील तमाम पत्रकारांना बसला. गोदी मिडियामुळे देशातील सर्वच पत्रकारांकडं लोक संशयानं पाहू लागले. माध्यमांची विश्वासार्हता रसातळाला नेऊन ठेवण्याचं महापाप या लोकांनी केलं आहे. अगदी निवडणुकांनंतर च्या नावाखाली या लोकांनी जो गोंधळ घातला तो कुठल्याही परिस्थितीत क्षम्य नाही. त्यातून शेअर बाजार कोसळला. अब्जावधीला चुना लागला. हा देशद्रोहच आहे. अंजना ओम कश्यम, रूबिका लियाकत, रजत शर्मा, अमन चोपडा, सुधीर चौधरी, गुल्लु, अर्णब गोस्वामी, श्वेता सिंह, सुमित अवस्थी ही सारी मंडळी याला जबाबदार आहे. मराठीत देखील असे काही चेहरे आहेत.

प्रशांत किशोर सारख्या भंपक ''राजकीय विश्लेषकाला'' (?) डोक्यावर घेण्याचं पापही या लोकांनीच केलं. यांची सारयांची मिलीभगत होती.खरं म्हणजे प्रशांत किशोर यांचा एकही अंदाज कधी खरा ठरला नाही. शिवाय हा माणूस ज्या ज्या पक्षाचा माध्यम सल्लागार झाला किंवा त्यांच्या कच्छपी लागला त्या त्या पक्षाची वाट लागली. आज त्यांनी नरेंद्र मोदी यांना वाटेला लावलंय.

निवडणुकीत ''मोदी मॅजिक'' दिसेल अशी हवा या सर्वांनी तयार केली होती.

त्यांची हवा देशातील जागरूक मतदारांनी काढून घेतली. त्यामुळे नरेंद्र मोदी, अमित शहा, जे. पी. नड्डा, अदानी यांना जेवढं दु:ख झालं नसेल त्यापेक्षा जास्त दु:ख गोदी मिडियाच्या वरील सर्व पत्रकारांना झालं. ते आज नक्कीच आपली छाती बडवून घेत असतील.उद्या इंडिया अलायन्सचं सरकार जर आलं तर मोदी, शहांच्या राजकीय कारकीर्दीचा जसा होणार आहे तव्दतच गोदी मिडियाच्या वरील मित्रांच्या पत्रकारितेतील करिअरचा देखील होणार आहे. हे लाचार चेहरे पुन्हा टीव्हीच्या पडद्यावर कधी दिसणार नाहीत. हा प्रशांत किशोरचा अंदाज नाही. माझा अंदाज आहे.

एस.एम.देशमुख

भ्रष्टाचाराच्या खटल्यात मद्रास उच्च न्यायालयाचा महत्वपूर्ण निर्णय !

मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपिठाने एका खटल्याच्या संदर्भात दिलेल्या ऐतिहासिक निर्णयाची सध्या देशभर चर्चा सुरु आहे. शक्तिवेल नावाच्या एका भ्रष्टाचारी सरकारी कर्मचाऱ्याच्या विरोधात २०१७ सालापासून न्यायालयात एक खटला सुरु होता. त्यातच या कर्मचाऱ्याचे निधन झाले. तेव्हा 'पतीला भ्रष्टाचार करण्यापासून न रोखणे म्हणजे त्याने अनधिकृतपणे कमावलेल्या पैशांचा उपभोग घेतला', असे सांगत न्यायालयाने त्याची पत्नी देवनायकी हिला १ वर्षाचा कारावास आणि १ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. न्यायालयाने दिलेल्या शिक्षेच्या विरोधात देवनायकी हिने उच्च न्यायालयात अपील केले होते; मात्र न्यायालयाने ते अपील फेटाळून लावले. निकाल देतांना मदुराई उच्च न्यायालयाने म्हटले, ''भ्रष्टाचार घरापासून चालू होतो आणि गृहिणी जर भ्रष्टाचारात सहभागी असेल, तर त्याला अंत नाही. सरकारी नोकराच्या पत्नीचे कर्तव्य आहे की, आपल्या पतीला लाच घेण्यापासून रोखणे. लाचखोरीपासून दूर रहाणे, हेच जीवनाचे मूळ तत्त्वज्ञान आहे. जर कुणी लाच घेतली, तर त्यांना ते भोगावे लागेल. या देशात भ्रष्टाचार अकल्पितपणे बोकाळला आहे. देवनायकीला गैरमार्गाने मिळालेल्या पैशांचा लाभ झाला आणि आता तिला शिक्षा भोगावी लागेल.''

सरकारी अधिकारी आणि भ्रष्टाचार हे समीकरण राज्यासह देशभरात प्रचलित झाले आहे. लाच दिल्याशिवाय सरकार दरबारी जमा केलेली कागदपत्रे, फाईल्स पुढे सरकतच नाहीत याचा अनुभव अनेकांनी घेतला आहे. लाच देणारे देतात म्हणूनच घेणाऱ्यांचे फावते असेही काहीजण म्हणतात. हुंडा घेणे आणि देणे दोन्हीही गुन्हेच आहेत तसे लाच देणे आणि घेणे दोन्हीही गुन्हेच आहेत. अल्प वेळेत आणि अल्प श्रमात सरकार दरबारी काम करून घ्यायचे असेल, तर लाच द्यावीच लागते ही प्रथा आज सरकार दरबारी रूढ झाली आहे. कर्तव्यभावनेला तिलांजली देऊन जडलेल्या भ्रष्टाचाराच्या सवयीमुळे सरकारी कर्मचारी आणि अधिकारी यांमध्ये काम टाळण्याची वृत्ती निर्माण होत आहे. सामान्य नागरिकांच्या मासिक वेतनातून करररूपाने सरकार दरबारी जाणाऱ्या पैशातून ही अधिकारी मंडळी गलेलठ्ठ वेतन घेत असतात. तरीही यांची भूक भागत नाही म्हणून त्याच अन्नदात्याच्या असहायतेचा गैरफायदा घेऊन त्याला लुबाडतात. शिपायापासून वरिष्ठ अधिकाऱ्यांपर्यंत भ्रष्टाचाराची एकसंध साखळी असल्याने खालचा अधिकारी कामाचे पैसे मागतो म्हणून वरच्या अधिकाऱ्याकडे तक्रारही करता येत नाही. सरळमार्गाने काम करून घायचे असेल, तर त्यासाठी सरकार दरबारी अनेकदा चकरा माराव्या लागतात. पुन्हा पुन्हा कामाचे खाडे नकोत म्हणून सामान्य नागरिक अधिकाऱ्याच्या मागणीप्रमाणे पैसे देतो आणि आपला वेळ वाचवतो, अशा प्रकारची ही प्रक्रिया सरकारी कार्यालयांत अविरतपणे सुरु असते. सामान्य नागरिक वेळ आणि कार्यालयाच्या सुट्या वाचवण्यासाठी भ्रष्टाचाराला खतपाणी घालत असतो. अर्थात या भ्रष्ट क्षेत्रामध्येही काही कर्तव्यनिष्ठ आणि कार्यतत्पर अधिकारी असतात; मात्र यांची संख्या तुलनेने कमी असल्याने सरकारी कार्यालयांत भ्रष्टाचार हाच शिष्टाचार बनला आहे. देशात लाच घेणे हा लाचलुचपत प्रतिबंधक कायदा १९८८ आणि भारतीय दंड विधान संहिता कलम १७१ नुसार दंडनीय गुन्हा आहे. या कायद्यानुसार लाच घेण्यासमवेत लाच देणेही गुन्हा आहे. वर्ष २०२२ मध्ये भ्रष्टाचार निर्देशांक घोषित करण्यात आला, ज्यामध्ये भारत ४० गुणांसह ८५ व्या स्थानावर होता. यावरून आपल्या देशात भ्रष्टाचारात गुंतलेल्या अधिकार्यांची संख्या अल्प नाही, हे स्पष्ट होते. भ्रष्ट सरकारी अधिकाऱ्यांच्या वाढत्या मागण्यांना कंटाळून काही जण त्यांच्याबाबतची तक्रार लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडे करतात. लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधिकारी जाळे लावून अशा अधिकाऱ्यांना रंगेहात पकडतात. या अधिकाऱ्यांनी अन्य काही संपत्ती गैरमार्गाने कमावली आहे का हे तपासण्यासाठी अशांची बँक खाती सील केली जातात, त्यांच्या स्थावर जंगम मालमत्तेची तपासणी केली जाते, अशावेळी थोड्या थोडक्या सेवाकालावधीमध्ये त्यांनी डोळे पांढरे होतील अशी गडगंज संपत्ती कमावल्याचे समोर येते. सरकारी अधिकाऱ्याची श्रेणी जेव्हढी अधिक तेव्हढाच अवैध संपत्तीचा आकारही अवाढव्य असतो. भ्रष्टाचाराच्या स्पर्धेमध्ये स्त्री अधिकारीही भारतात मुळीच मागे नाहीत. सरकारी सेवेत घरातील पुरुष असेल तर पत्नीला आणि सरकारी कर्मचारी स्त्री असेल तर तिच्या पतीला परस्परांच्या मासिक वेतनाची माहिती नक्कीच असते. मासिक वेतनापेक्षा अधिक पैसा, दागिने, मौल्यवान वस्तू सरकारी कर्मचाऱ्याकडून घरी आणले जात असेल तर ते मासिक वेतनातून आणलेले नाही हे परस्परांना नक्कीच लक्षात येते. सर्व प्रकारच्या सुख दु:खात, चढ उतारांत एकमेकांना साथ देणाऱ्या स्त्री पुरुषाने आपल्या जीवनसाथीला गैरमार्गाने संपत्ती मिळवण्यास मज्जाव करणे हे तिचे कर्तव्यच आहे. अशावेळी भ्रष्ट सहकाऱ्याला वेळीच न रोखता त्याकडे दुर्लक्ष करणे, त्याला अधिक भ्रष्टाचार करण्यास प्रवृत्त करणे अथवा भ्रष्टाचार करण्यास प्रोत्साहन देणे, सहकाऱ्याने भ्रष्ट मार्गाने कमावलेल्या पैशाचा वापर स्वत:सह आपल्यावर अवलंबून असलेल्यांच्या सुखासाठी करणे हे सुद्धा भ्रष्टाचार करण्याइतकेच दंडनीय आहे. लहानपणी शालेय जीवनात वाल्या कोळ्याची गोष्ट आपल्यापैकी प्रत्येकानेच ऐकलेली आहे. दरोडेखोर वाल्या कोळ्याने लोकांना लुबाडून कमावलेल्या संपत्तीच्या पापात त्याची पत्नी आणि मुले कोणीच सहभागी होण्यास तयार नसतात त्यामुळे त्याला उपरती होते. धर्मशास्त्रानुसार पती गैरमार्गाने संपत्ती कमावत असेल आणि पत्नी त्याला तसे करण्यापासून परावृत्त करत नसेल तर पतिने केलेल्या पापाचे फळ पत्नीलाही भोगावे लागते. याच न्यायाने मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपिठाने दिलेला निर्णय महत्वाचा ठरतो आहे. सरकार दरबारी काम होण्यासाठी दिलेला पैसा हा सामान्य नागरिकांच्या मेहनतीचा आणि प्रामाणिकपणे काम केल्याचा मोबदला असतो. इच्छा नसतानाही तो इतरांना बहाल करताना त्यामागे त्याचा तळतळाटसुद्धा असतो त्यामुळे भ्रष्टाचाऱ्याच्या तो कितपत पचनी पडणार ? अध्यात्मशास्त्रानुसार वैयक्तिक स्वार्थासाठी गैरमार्गाने इतरांकडून धन लुबाडणे हे फार मोठे पाप असून त्याच्या फळस्वरूपात लुबाडणाऱ्याची या नाहीतर पुढील जन्मात निश्चितपणे कित्येक पटीने हानी होते.

आजमितीला बेरोजगारी ही एक मोठी समस्या बनली असून अनेक सुशिक्षित बेरोजगार नोकरीच्या शोधात वणवण फिरत असतात. अशा स्थितीत सरकारी नोकरीतून मिळणारे गलेलठ्ठ वेतन, विविध भत्ते, सातवा वेतन आयोग, सेवाकाळात राहण्यासाठी मिळणारे घर, वैद्यकीय खर्च, निवृत्ती वेतन एव्हढे सर्व लाभ मिळत असताना अधिक धनाच्या लालसेने सरकारी कर्मचाऱ्याकडून घेतली जाणारी लाच आणि केला जाणारा भ्रष्टाचार हे घोर कुकृत्य नव्हे का ? अशा कुकृत्यांना खतपाणी घालणारा सहकारीही तेव्हढ्याच पापाचा धनी ठरतो. सध्याच्या शिक्षणपद्धतीत व्यावहारिक शिक्षण दिले जाते; मात्र नीती आणि नैतिक मूल्याबाबतचे शिक्षण विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासक्रमातून दिले जात नसल्याने भ्रष्ट मार्गाने धन कमावून आपण काही चुकीचे करत आहोत किंवा त्याचे परिणाम आज ना उद्या आपल्याला भोगावेच लागणार आहेत याबाबत तेही अनभिज्ञ असतात. पूर्वीच्या काळी भारतात गुरुकुल शिक्षण पद्धती प्रचलित होती. व्यावहारिक ज्ञानासोबत नीती आणि नैतिक मूल्यांचे शिक्षण त्यांना गुरुकुलातूनच मिळत असे. त्यामुळे गुरुकुलातून बाहेर पडणारा प्रत्येक विद्यार्थी हा गुणसंपन्न, नीतिवान आणि धैर्यवान असे. त्यामुळे त्याकाळी भ्रष्टाचार सुद्धा होत नसे. मद्रास उच्च न्यायालयाच्या मदुराई खंडपिठाने दिलेल्या निर्णयातून समाजात एक महत्वाचा पायंडा पाडला जाणार आहे. या पायंड्यामुळे येणाऱ्या काळात काही प्रमाणात जरी भ्रष्टाचार कमी होऊ शकला तरी त्याचे श्रेय मद्रास उच्च न्यायालयाला दिले जाणार आहे.

जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई
मो.९६६४५५९७८०

पान १वरून...

देशात यंदा ३२८८.५२

सांख्यिकी अधिकाऱ्यांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारावर हा अंदाज तयार करण्यात आला आहे. देशातील एकूण अन्नधान्य उत्पादनातील ३२८८.५२ लाख टनांमध्ये तांदूळ १३६७.०० लाख टन, गहू ११२९.२५ लाख टन, मका ३५६.७३ लाख टन, तूर ३३.८५ लाख टन, हरभरा ११५.७६ लाख टन आणि एकूण तेलबिया ३९५.९३ लाख टन यात सोयाबीन १३०.५४ लाख टन, रेपसीड आणि मोहरी १३१.६१ लाख टन, ऊस ४४२५.५२ लाख टन, कापूस ३२५.२२ लाख गासड्या (प्रत्येकी १७० किलो) आणि ताग ९२.५९ लाख गासड्या (प्रत्येकी १८० किलो) इतके उत्पादन नोंदवले जाण्याची शक्यता आहे.

जरांगे फॅक्टरची जादु; मराठवाड्यात

संघर्ष उभ्या महाराष्ट्राने पाहिला. पुढे लोकसभा निवडणुक लागल्यावर मनोज जरांगे यांनी राजकारणाची भाषा सुरु केली. प्रत्येक मतदार संघात हजार दोन हजार उमेदवार उभे करण्याची त्यांनी घोषणा केली. त्यातून पुन्हा त्यांनी माघार घेत मराठा आरक्षणाला विरोध करणाऱ्यांना असे पाडा की त्यांच्या पाच पिढ्या उठल्या नाही पाहिजे, असा समाजाला संदेश दिला. त्यातून मराठा समाजाने जो संदेश घ्यायचा तो बरोबर घेत भाजप आणि ओबीसी उमेदवार टार्गेट केले. बीडमध्ये पंकजा मुंडे, परभणीत महादेव जानकर, संभाजीनगरात चंद्रकांत खैरे यांना मते केली नाहीत. तर इतर ठिकाणी भाजप व मित्रपक्षांच्या मराठा उमेदवारांनाही बाजूला करीत इतर उमेदवारांना मते दिली. त्यामुळे लातूर सोडता ८ पैकी ७ मराठा खासदार मराठवाड्यात विजयी झाले आहे. हा चमत्कार जरांगे फॅक्टरचा असून यावेळी मराठवाड्यात माधवं फॅक्टरला जरांगे फॅक्टर जड गेल्याचे चित्र आहे. नांदेडमध्ये काँग्रेसचे वसंतराव चव्हाण, धाराशिव ठाकरे शिवसेनेचे ओमराजे निंबाळकर, बीडमध्ये शरद पवार गटाचे बजरंग सोनवणे, जालना येथे काँग्रेसचे कल्याण काळे, परभणीत ठाकरे गटाचे बंडू उर्फ संजय जाधव आणि हिंगोली मतदारसंघात ठाकरे गटाचे नागेश पाटील आष्टीकर हे विजयी झालेले सर्व मराठा खासदार आहेत. त्यामुळे मराठवाड्यात माधवं फॅक्टरला जरांगे फॅक्टर वरचढ ठरला असून विधानसभा निवडणुकीत पुन्हा एकदा माधवं विरुध्द जरांगे फॅक्टर असा सामना होणार असल्याचे चित्र आहे. पण त्यावेळी बऱ्याच मतदार संघात दोन्ही उमेदवार हे मराठा असण्याची जास्त शक्यता आहे. फारच कमी ठिकाणी मराठा विरुध्द ओबीसी अशी लढत होऊ शकते. त्यामुळे ज्या ठिकाणी दोन्ही उमेदवार मराठा असतील त्याठिकाणी ओबीसींच्या हाती विजयाच्या चाव्या असणार आहेत, हेही तेवढेच सत्य.

अजित पवारांचे नाराज

होता. तर ज्या आमदारांनी आतापर्यंत शरद पवारांवर टीका केली नाही त्यांच्यासाठी परतीचे दरवाजे उघडे असतील असेही ते म्हणाले होते.

अजित पवारांच्या आमदारांमध्ये चलबिचल

एकीकडे अजित पवार एनडीएच्या बैठकीला गैरहजर राहिल्याने ते नाराज असल्याची चर्चा सुरु आहे. महायुतीच्या जास्त जागा निवडून येतील असा विश्वास असताना त्यांना अपेक्षित यश मिळाले नाही आणि महाविकास आघाडीने बाजी मारली. त्यानंतर अजित पवार गटाच्या आमदारांमध्येही चलबिचल पाहायला मिळत आहे. त्यामुळे आमदारांकडून सुप्रिया सुळेंना संपर्क करण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा आहे.

लोकसभा निकालाचा परिणाम

आपला पराभव स्वीकारला. मात्र, पंकजा मुंडे यांनी शरद पवार गट आणि उद्धव ठाकरे गटाविषयी केलेल्या वक्तव्यांमुळे राजकीय वर्तुळाच्या भुवया उंचावल्या आहेत.

यावेळी बोलताना पंकजा मुंडे म्हणाल्या, प्रत्येक गोष्टीचा परिणाम हा प्रत्येक गोष्टीवर होत असतो. त्यामुळे जे पक्ष फुटले, तरीही लोकसभेत त्यांचे जास्त खासदार निवडून आले, त्यांचा आत्मविश्वास वाढेल. समोरच्या बाजूला अत्यंत अनुभवी नेते आहेत. शरद पवार यांच्यासारख्या अनुभवी नेता आहे, त्यांना चांगल्या जागा मिळाल्या आहेत. उद्धव ठाकरेजींच्या शिवसेनेलाही जास्त जागा मिळाल्या आहेत. त्यामुळे आम्ही पक्ष म्हणून आणि महायुती म्हणून जास्त मेहनत केली पाहिजे. या निकालाचा परिणाम विधानसभेवर नक्कीच होणार आहे. प्रत्येक गोष्टीचा परिणाम हा प्रत्येक गोष्टीवर होत असतो, हे नाकारुन चालणार नाही. जातीयवादाचा माझ्या निवडणुकीवर परिणाम होत आहे, हे मी सतत सांगत होते. आगामी विधानसभा निवडणुकीवरही याचा परिणाम होईल. लोकसभेच्या विजयाने आता समोरच्या बाजूचा आत्मविश्वास दुणावला आहे. याच आत्मविश्वासने ते आता विधानसभा निवडणुकीला सामोरे जातील. त्यांचे खासदार निवडून आले आहेत. याशिवाय, ज्या भागातून या खासदारांना लीड मिळाली, त्या भागातील आमदारांसाठी विधानसभा निवडणुकीला चांगली परिस्थिती असेल. त्यादृष्टीने आमच्या पक्षाला स्ट्रॅटेजी आखावी लागेल, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले.

मी फेरमतमोजणीची मागणी केली होती. पण ती मान्य झाली नाही. यामुळे कार्यकर्ते नाराज आहेत. पण मला माझा पराभव मान्य आहे. पराभवदेखील हा प्रतिष्ठेने स्वीकारला पाहिजे, अशी शिकवण मुंडे साहेबांनी आम्हाला दिली आहे. उलट पराभव झाल्यानंतर चेहरा अधिक प्रसन्न आणि हसरा ठेवून लोकांमध्ये जायला पाहिजे, असे त्यांनी आम्हाला शिकवले. कारण लोक आपल्यासाठी मर मर काम करतात. त्यामुळे लोकांना वाटता कामा नये की आपला नेता डळमळीत झाला आहे. लोकांनी मला अपेक्षित दिली त्यासाठी मी त्यांची ऋणी आहे, असे पंकजा मुंडे यांनी म्हटले.

फडणवीसांच्या राजीनाम्याच्या

परिषदेत स्पष्ट केले आहे.

राजीनाम्याचे केवळ नाटक – अतुल लोंढे

महाराष्ट्रात भाजपाची कामगिरी अत्यंत खराब झालेली आहे याची उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाणीव झाली, आता केंद्रीय नेतृत्वाकडून कारवाई होण्याआधीच राजीनामा देण्याचे नाटक ते करत आहेत, असा हल्लाबोल महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे मुख्य प्रवक्ते अतुल लोंढे यांनी फडणविसांच्या राजिनामा घोषणेवर केला आहे. लोंढे म्हणाले की, राज्यात असंवैधानिक सरकार चालवत आहे हे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीच सांगितले आहे. मी पुन्हा येईन, मी पुन्हा येईन म्हणत दोन पक्ष फोडून आलो हेही फडणवीस यांनीच जाहीरपणे सांगितले आहे. सरकारी यंत्रणांचा गैरवापर करून शिवसेना व राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हिरावून मित्रांना दिले व त्या पक्षाचे चिन्हही काढून घेतले. भारतीय जनता पक्षाने सरकारी यंत्रणेच्या माध्यमातून हे पक्षफोडीचे जे राजकराण केले ते महाराष्ट्रातील जनतेला आवडले नाही. भाजपाच्या पराभवाची खरी जबाबदारी तर नरेंद्र मोदी यांनी घेऊन राजीनामा द्यायला हवा कारण भाजपाने लोकसभा निवडणुक ही नरेंद्र मोदींच्या चेहऱ्यावरच लढवली आहे, असे अतुल लोंढे म्हणाले.

फडणवीस कॅप्टन, त्यांनी बाजुला जाणे योग्य नाही

पराभवानंतर दु:ख होणे स्वाभाविक आहे, किंवा आपल्यामुळेच हे झाले असे त्यांना वाटत असावे. पण, मला स्वत: त्यांना सांगायचे आहे की, यश-अपयश ही सर्वांचीच जबाबदारी आहे. कोणा एकावर ठपका ठेवणे बरोबर नाही. महायुतीचे हे झाड थोडेसे वाढळामध्ये सापडले आहे, अशा वेळी जे कॅप्टन्स आहेत, त्यांनी बाजूला होणे हे बरोबर नाही. मजबुतीने सर्वांनी एकत्र राहून येणाऱ्या विधानसभांच्या निवडणुकांची तयारी करायला पाहिजे, असे मत महायुतीचे नेते आणि मंत्री छगन भुजबळ यांनी व्यक्त केले आहे. जबाबदारी केवळ फडणवीसांवर सोपवणे किंवा त्यांनीही ती जबाबदारी स्वत:वर घेणे योग्य नाही. माझे त्यांना एवढेच सांगणे आहे की, तुमच्यासोबत आम्ही सर्वजण आहोत, सगळे आमदार आहेत. आता, मजबुतीने लढले पाहिजे. हे अपयश येणाऱ्या ४-५ महिन्यात होणाऱ्या निवडणुकांतून धुवून काढले पाहिजे, असे भुजबळ यांनी म्हटले आहे.

इंडिया आघाडीच्या बैठकीत

त्यांच्या आणि त्यांच्या राजकारणाच्या शैलीच्या विरोधात दिला. स्पष्ट नैतिक पराभव होण्याव्यतिरिक्त हे वैयक्तिकरित्या त्यांच्यासाठी खूप मोठे राजकीय नुकसान आहे, तथापि, लोकांच्या इच्छेचा भंग करण्याचा त्यांचा निर्धार आहे. इंडिया आघाडी सर्व पक्षांचे स्वागत करते जे आपल्या राज्यघटनेच्या प्रस्तावनेत अंतर्भूत असलेल्या मूल्यांसाठी आणि आर्थिक, सामाजिक आणि राजकीय न्यायाच्या अनेक तरतुदींशी आपली मूलभूत बांधिलकी समजतात असे सांगितले. या बैठकीला पक्षप्रमुख मल्लिकार्जुन खर्गे, काँग्रेस संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी, राहुल गांधी आणि प्रियंका गांधी वड्रा यांच्यासह काँग्रेसचे प्रमुख नेतेही उपस्थित होते. या बैठकीला तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.के. स्टॅलिन आणि द्रमुकचे टी.आर.बालू, झारखंडचे मुख्यमंत्री चंपाई सोरेन आणि झामुमोच्या कल्पना सोरेन, राष्ट्रवादीचे शरद पवार आणि सुप्रिया सुळे, अखिलेश यादव आणि राम गोपाल यादव (सपा), अभिषेक बॅनर्जी (टीएमसी), तेजस्वी यादव (आरजेडी), संजय राऊत आणि अरविंद सावंत (शिवसेना-यूबीटी), ओमर अब्दुल्ला (जेकेएनसी), सीताराम येचुरी (सीपीआय-एम), डी राजा (सीपीआय), संजय सिंह आणि राघव चड्ढा (आप) आणि एन.के. प्रेमचंद्रन (आरएसपी) आदीजण उपस्थित होते.

एनडीएच्या नेतेपदी

राष्ट्रपतींनी त्यांना ७ जूनची तारीख दिली आहे. भारताच्या १४० कोटी देशवासियांनी गेल्या १० वर्षात पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली एनडीए सरकारच्या लोककल्याणकारी धोरणांमुळे देशाच्या प्रत्येक क्षेत्राला विकसित होताना पाहिले आहे. बऱ्याच काळापासून सुमारे ६ दशकांनंतर भारताच्या जनतेने सलग तिसऱ्यांदा पूर्ण बहुमताने सशक्त नेतृत्वाची निवड केली आहे. आपल्या सर्वांना गर्व आहे की, २०२४ ची लोकसभा निवडणूक एनडीएने नरेंद्र मोदींच्या नेतृत्वाखाली एकजुटीने लढली आणि जिंकली. आम्ही सर्वजण एनडीएचे नेते नरेंद्र मोदी यांना सर्वसंमतीने आमचा नेता म्हणून निवड करतो. मोदींच्या नेतृत्वात एनडीए सरकार भारताच्या गरीब-महिला-तरुण-शेतकरी आणि शोषित, वंचित आणि पीडित नागरिकांच्या सेवेसाठी प्रतिबद्ध आहे. भारताचा वारसा संरक्षित करुन देशाच्या सर्वांगिण विकासासाठी एनडीए सरकार भारताच्या लोकांच्या जीवनात सुधारणा करण्यासाठी काम करत राहिल. असे प्रस्तावात म्हटले असून, हा प्रस्ताव ५ जून रोजी नवी दिल्लीत मंजूर झाला आहे. एनडीएच्या बैठकीनंतर ७ जून रोजी एनडीएचे नेते राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेणार आहेत. राष्ट्रपतींनी त्यांना भेटीसाठी वेळ दिली आहे. यावेळी एनडीएचे प्रमुख नेते मिळून राष्ट्रपतींकडे सत्ता स्थापनेचा दावा करणार

दैनिक राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार, दि. ६ जून २०२४ ३

अंगाला विजयाचा गुलाल, पुढे वडिलांचा फोटो, आईला मिठी मारताच ओम राजेनिंबाळकर ढसाढसा रडले!

मुंबई : लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात महायुतीला मोठा फटका बसला आहे. भाजपचा अनेक जागांवर पराभव झाला आहे. यावेळी महाराष्ट्रातील अनेक लोकसभा मतदारसंघ चर्चेत होते. यातही उस्मानाबादमध्ये कोण बाजी मारणार याची उत्सुकता सर्वांनाच लागली होती. या जागेवरून उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेचे ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी अजित पवार यांच्या राष्ट्रवादीच्या अर्चना पाटील यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव केला. दरम्यान, या विजयानंतर ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी मोठा जल्लोष केला. याच जल्लोषादरम्यानचा त्यांचा एक व्हिडीओ सध्या व्हायरल होत आहे.

राजेनिंबाळकर झाले भावुक

ओम राजेनिंबाळकर यांनी अर्चना पाटील यांना तब्बल ३ लाख २९ हजार ८४६ मतांनी पराभूत केलं. ओम राजेनिंबाळकर यांना तब्बल ७ लाख ४८ हजार ७५२ मते पडली. दुसरीकडे अर्चना पाटील यांना ४ लाख १८ हजार ९०६ मते मिळाली. या दमदार विजयानंतर ओम राजेनिंबाळकर यांच्या समर्थकांनी संपूर्ण उस्मानाबाद मतदारसंघात जल्लोष केला. ओम राजेनिंबाळकर हेदेखील आनंदात लोकांचे आभार मानत होते.

भाजपमध्ये पहिला राजीनामा पडला

नवनीत राणांचा पराभव, अमरावतीत राजकीय खलबतं

अमरावती । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकांच्या निकालानंतर राज्यातील राजकीय परिस्थिती वेगळ्याच वेळणावर गेल्याचं पाहायला मिळालंय. राज्यात महायुती विरुद्ध महाविकास आघाडी यांच्यात जोरदार लढत झाली. ४५ पेक्षा जास्त जागांवर निवडून विजयाचा दावा करणाऱ्या महायुतीला केवळ १७ जागांवर विजय मिळाला असून महाविकास आघाडीने तब्बल ३० जागांवर विजय मिळवला आहे. त्यामुळे, राज्यातील महायुतीच्या पराभवाचा स्वीकार करुन आपण उपमुख्यमंत्री पदावरुन पायउतार होण्याची इच्छा व्यक्त करणार असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले. त्यासाठी, आपण भाजपच्या वरिष्ठ नेतृत्वाला विनंती करणार असल्याचंही त्यांनी म्हटलं. मात्र, फडणवीसांच्या या निर्णयानंतर भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी फडणवीसांचा हा निर्णय आम्हाला मान्य नसल्याचे म्हटले. देवेंद्र फडणवीस हे सरकारमध्ये असायलाच हवेत अशी भूमिका भाजपच्या आमदार व नेत्यांनी घेतली आहे. त्यातच, दुसरीकडे अमरावतीत भाजपच्या

उमेदवार नवनीत राणा यांच्या पराभवाची जबाबदारी स्वीकारुन येथील शहर जिल्हा अध्यक्षांनी राजीनामा दिला आहे.

अमरावती भाजपचे शहर जिल्हाध्यक्ष प्रवीण पोटे यांनी आपल्या शहर जिल्हाध्यक्ष पदाचा राजीनामा दिला आहे. अमरावतीमध्ये भाजपच्या उमेदवार नवनीत राणा यांचा पराभव झाला असून येथून काँग्रेसचे बळवंत वानखेडे विजयी झाले आहेत. त्यामुळे, येथील पराभवाची जबाबदारी स्वीकारुन भाजपच्या प्रवीण पोटे यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला आहे. त्यामुळे, निवडणूक निकालानंतर भाजपात पहिला राजीनामा पडल्याची चर्चा आता राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे. ''उपरोक्त विषयान्वये, मी अमरावती जिल्ह्यातील लोकसभा निवडणूकीमध्ये झालेल्या पराभवाची नैतिक जबाबदारी म्हणून अमरावती शहर जिल्हा अध्यक्ष पदाचा राजीनामा देत आहे. तरी राजीनाम्याचा स्विकार करावा, हि विनंती,'' असे पत्र प्रवीण पोटे यांनी भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे दिला आहे. त्यामुळे, लोकसभा निवडणुकांती पराभवाचे परिणाम आता पाहायला मिळत आहेत.

अमरावतीत नवनीत राणा यांना विजयाचा विश्वास होता. त्यामुळे, निवडणुकांपूर्वीच भाजपमध्ये प्रवेश घेऊन भाजपने त्यांना लोकसभेची उमेदवारी दिली होती. विशेष म्हणजे राणा यांच्यासाठी स्वत: पंतप्रधान नरेंद्र मोदींनीही प्रचारसभा घेतली होती. तर, हिंदू शेरणी म्हणून राणांचा प्रचारही करण्यात आला. मात्र, अमरावतीतील जनतेनं नवनीत राणांना नाकारत काँग्रेसला विजयी केले. दरम्यान, राणा यांच्या उमेदवारीला भाजपमधूनच काही जणांनी विरोध केला होता. मात्र, देवेंद्र फडणवीस यांनी समजूत घातल्यानंतर भाजपमधील हा विरोध मावळला. तरी, प्रहार संघटनेचे प्रमुख आमदार बच्चू कडू यांनी राणांविरुद्ध रणशिंग फुंकले होते. आमदार कडू यांनी राणांविरुद्ध उमेदवारही उभा केला होता.

नवनीत राणांचा १९ हजार मतांनी पराभव

अमरावतीमध्ये काँग्रेसचे उमेदवार बळवंत वानखेडे यांचा विजय झाला. त्यांना एकूण ५ लाख २६ हजार २७१ मतं मिळाली. दुसरीकडे भाजपच्या उमेदवार नवनीत राणा यांना ५ लाख ६५ हजार ४० मते मिळाली आहेत. राणा यांचा १९ हजार ७३१ मतांनी पराभव झाला आहे. महायुतीचा भाग असलेल्या प्रहार जनशक्ती या पक्षानेही अमावतीतून उमेदवार दिला होता. त्यांच्या बळवंत बुब या उमेदवाराला ८५ हजार ३०० मते मिळाली आहेत. म्हणजेच प्रहार जनशक्तीच्या उमेदवारामुळे राणा यांना मिळणारी मतं फुटली आहेत.

राज्यात कोणाला किती जागा

महाराष्ट्रातील ४८ जागांपैकी महाविकास आघाडीला ३० जागा मिळाल्या असून महायुतीला केवळ १७ जागा जिंकता आल्या आहेत. सांगलीतून अपक्ष उमेदवार विशाल पाटील यांनी विजय मिळवला आहे. महाविकास आघाडीत काँग्रेसने सर्वाधिक १३ जागा जिंकल्या, तर शिवसेना ठाकरे गटाला ९ जागांवर विजय मिळाला आहे. शरद पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसने ८ जागा जिंकल्या. दुसरीकडे महायुतीमध्ये भाजपने सर्वाधिक ९ जागा जिंकल्या, तर शिंदेंच्या शिवसेनेला ७ जागा मिळाल्या आहेत. अजित पवारांच्या राष्ट्रवादीने १ जागा जिंकली. दरम्यान, १३ जागांसह राज्यात काँग्रेस सर्वात मोठा पक्ष ठरला आहे.

महाराष्ट्रातील विजयी उमेदवार

म. सं. क्र.	मतदारसंघ	विजयी उमेदवाराचे नाव (पक्ष)
१.	नंदुरबार	गोवाल पाडवी (काँग्रेस)
२.	धुळे	शोभा बच्छाव (काँग्रेस)
३.	जळगाव	स्मिता वाघ (भाजप)
४.	रावेर	रक्षा खडसे (भाजप)
५.	बुलढाणा	प्रतापराव जाधव (शिवसेना)
६.	अकोला	अनुप धोत्रे (भाजपा)
७.	अमरावती	बळवंत वानखेडे (काँग्रेस)
८.	वर्धा	अमर काळे (शरद पवार)
९.	रामटेक	शामकुमार बर्वे (काँग्रेस)
१०.	नागपूर	नितीन गडकरी (भाजप)
११.	भंडारा-गोंदिया	प्रशांत पडोळे (काँग्रेस)
१२.	गडचिरोली-चिमूर	नामदेव किरसान (काँग्रेस)
१३.	चंद्रपूर	प्रतिभा धानोरकर (काँग्रेस)
१४.	यवतमाळ-वाशिम	संजय देशमुख (उबाठा)
१५.	हिंगोली	नागेश पाटील (उबाठा)
१६.	नांदेड	वसंत चव्हाण (काँग्रेस)
१७.	परभणी	संजय जाधव (उबाठा)
१८.	जालना	कल्याण काळे (काँग्रेस)
१९.	औरंगाबाद	संदीपान भुमरे (शिवसेना)
२०.	दिंडोरी	भास्करराव भगरे (शरद पवार)
२१.	नाशिक	राजाभाऊ वाजे ((उबाठा))
२२.	पालघर	हेमंत सावरा (भाजप)
२३.	भिवंडी	बाळ्या मामा म्हात्रे (शरद पवार)
२४.	कल्याण	श्रीकांत शिंदे (शिवसेना)
२५.	ठाणे	नरेश म्हस्के (शिवसेना)
२६.	मुंबई उत्तर	पियुष गोयल (भाजप)
२७.	मुंबई उत्तर पश्चिम	रवींद्र वायकर (शिवसेना)
२८.	मुंबई उत्तर पूर्व	संजय दिना पाटील (उबाठा)
२९.	मुंबई उत्तर मध्य	वर्षा गायकवाड (काँग्रेस)
३०.	मुंबई दक्षिण मध्य	अनिल देसाई (उबाठा)
३१.	मुंबई दक्षिण	अरविंद सावंत (उबाठा)
३२.	रायगड	सुनील तटकरे (राष्ट्रवादी)
३३.	मावळ	श्रीरंग बारणे (शिवसेना)
३४.	पुणे	मुरलीधर मोहोळ (भाजप)
३५.	बारामती	सुप्रिया सुळे (शरद पवार)
३६.	शिरुर	अमोल कोल्हे (शरद पवार)
३७.	अहमदनगर	निलेश लंके (शरद पवार)
३८.	शिर्डी	भाऊसाहेब वाकचौरे (उबाठा)
३९.	बीड	बजरंग सोनवणे (शरद पवार)
४०.	उस्मानाबाद	ओमराजे निंबाळकर (उबाठा)
४१.	लातूर	शिवाजी काळगे (काँग्रेस)
४२.	सोलापूर	प्रणिती शिंदे (काँग्रेस)
४३.	माढा	धैर्यशील मोहिते (शरद पवार)
४४.	सांगली	विशाल पाटील (अपक्ष)
४५.	सातारा	उदयनराजे भोसले (भाजप)
४६.	रत्नागिरी-सिंधुदुर्ग	नारायण राणे (भाजप)
४७.	कोल्हापूर	शाहू महाराज (काँग्रेस)
४८.	हातकणंगले	धैर्यशील माने (शिवसेना)

संस्थापक अध्यक्ष सूर्यवंशी यांचा वाढदिवस शांतीवन येथे साजरा

परळी । प्रतिनिधी

राष्ट्रीय पुरोगामी पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष श्री विजयजी सूर्यवंशी साहेब यांचा वाढदिवस शांतीवन येथील कुष्ठरोग निवारण समितीच्या आवारात वृक्षारोपण करून धुमधडाक्यात साजरा करण्यात आला.

ज्या संघटनेची स्थापनाच वृक्षारोपण करून करण्यात आली त्या संघटनेत वृक्षारोपणाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. त्यामुळे संस्थापक अध्यक्षांनी नारा दिला आहे की झाडे लावा झाडे जगवा. या उद्देशानेच वाढदिवसानिमित्त संपूर्ण महाराष्ट्रात झाडे लावुन वाढदिवस साजरा करण्यात आला. रायगड जिल्हा उगमस्थान असल्यामुळे येथे दरवर्षी वाढदिवसानिमित्त झाडे लावुनच वाढदिवस साजरा केला जातो. म्हणून या वर्षी पण शांतीवन येथे वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी संस्थापक अध्यक्ष विजयजी सूर्यवंशी, राष्ट्रीय सचिव प्रवीण परमार, विश्वस्त मनिषा परमार, विश्वस्त झुंबर सिंग पाटील, विश्वस्त अनिकेत सुर्यवंशी, आदित्य सुर्यवंशी

विश्वस्त विनायक शिंदे, रायगड जिल्हा अध्यक्ष धनाजी पुदाले, सचिव राजपाल शेगोकार, सह सचिव दत्तु ठोके, पनवेल तालुका रायगड जिल्हा कोषाध्यक्ष मच्छिंद्र पाटील अध्यक्ष गणेश पराड, अन्याय अत्याचार निवारण समितीचे पनवेल तालुका संघटक मंगेश खुटले, शिवधर्मचे सह संपादक अमोल पाटील, पत्रकार उमाजी मंडले, पत्रकार शितल पाटील, ठाणे जिल्हा उपाध्यक्ष प्रितमसिंग चव्हाण, नाशिक येथील कुणाल ठोके, छत्रपती शिवाजी महाराज युनिव्हर्सिटीच्या अपर्णा कांबळे मॅडम,आकाश कुमार सर, विक्रांत सेन, निरमाली शर्मा, समृद्धी भोपे, जानवी ननावरे व आदिराज कांबळे आदी मान्यवर उपस्थित होते.

अभाविपची कार्यसमितीच्या बैठकीस प्रारंभ

बीड / प्रतिनिधी :अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ची एक-दिवसीय केंद्रीय कार्यसमिती बैठक गुजराताच्या सूरत मध्ये संपन्न झाली. बैठकीच्या प्रारंभी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद चे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजशरण शाही, राष्ट्रीय महामंत्री याज्ञवल्क्य शुक्ल आणि राष्ट्रीय संघटन मंत्री श्री आशीष चौहान यांनी दिप प्रज्ज्वलन व माता सरस्वती आणि स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमा पूजन केले आणि त्यानंतर सर्व प्रतिनिधींनी समूह वंदे मातरम्? गायल्या नंतर बैठकीला प्रारंभ झाला. बैठकीच्या सुरुवातीला पर्यावरण विषयात योगदान देण्यासाठी प्रतिनिधींनी शपथ घेतली आणि विश्व पर्यावरण दिवस साजरा केला.

७ ते ९ जून, दरम्यान गुजराताच्या सूरत मध्ये अखिल भारतीय विद्यार्थी परिषद ची राष्ट्रीय कार्यकारी परिषद बैठक आयोजित होणार आहे, ज्यात सर्व राज्यांचे प्रतिनिधी भाग घेणार आहेत. या बैठकीत शिक्षण, पर्यावरण, सामाजिक विषयांवर विस्तृत चर्चा केल्यानंतर देशभरातील विद्यार्थी परिषदच्या कार्यावर विस्तृत चर्चा होईल. ६ जून रोजी संध्याकाळी अखिल भारतीय विद्यार्थी परिषद चा नागरिक अभिनंदन सोहळा आयोजित करण्यात येईल, ज्यामध्ये मुख्य अतिथि म्हणून देशातील प्रसिद्ध अभिनेता मनोज जोशी आणि सूरतातील गणमान्य नागरिक उपस्थित राहणार आहेत.अखिल भारतीय विद्यार्थी परिषदचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजशरण शाही केंद्रीय कार्यसमिति बैठकीच्या उद्घाटन सत्रात म्हणाले की भारताची लोकशाही सदैव समृद्ध आणि सशक्त होत असून पूर्ण विश्वात एक सकारात्मक दिशा दाखवत आहे, भारत लोकशाहीची जननी आहे, ह्या लोकशाहीच्या व्यवस्थेत सर्वांचा सहभाग असल्याने देशात एक सकारात्मक वातावरण उत्पन्न झाले आहे. आधुनिक भारताची सशक्तता, बंधुत्व, आणि समानता या महत्वाच्या मूल्यांची धारणा अत्यंत प्राचीन काळपासून असून, त्यांना नियमित विकसित करण्याची आवश्यकता आहे. लोकशाहीचे मूल्य लोकजीवनात स्थापित करण्यासाठी लोकसंघर्ष केला पाहिजे. देशात 'स्व' आणि 'स्व-ज्ञान' या आधारित व्यवस्था नव्याने स्थापित करण्याचा प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे आणि विविध क्षेत्रांमध्ये भारतीय मूल्यांवर आधारित बदल आणण्यासाठी सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे. असे त्यांनी सांगीतले. या बैठकीस बीड जिल्ह्यातील पदाधिकारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आहेत.

इंडिया आघाडी देशात सत्ता स्थापन करेल

मुंबई । प्रतिनिधी

आम्ही दिल्लीला जाणार आहोत. सगळ्या घडामोडींवर आम्ही लक्ष ठेवून आहोत. आमचे सर्व नवनिर्वाचित खासदार सुद्धा उद्या परवा, मुंबईला जमा होतील. आणि तिथून सगळं प्लॅनिंग केल्या जाईल. राष्ट्रपती महोदयांनी इंडिया आघाडीच्या पक्षाला सत्ता स्थापन करण्याबाबत बोलावले तर, इंडिया आघाडी देशात सरकार स्थापन करेल, असा दावा काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनी केला आहे.

नाना पटोले देवेंद्र फडणवीस यांच्याबाबत बोलताना म्हणाले, सरकारमधून मुक्त व्हायचे की नाही, तो त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे. त्यांच्या पक्षाचा प्रश्न आहे. महाराष्ट्रामध्ये भाजपला जनतेनं नाकारलेले आहे. त्यांचे कारण पण आहे की, भाजप शेतकरी विरोधी राहिलेली आहे. महाराष्ट्रामध्ये यांच्या काळात मोठ्या प्रमाणात शेतकरी आत्महत्या देखील झालेल्या आहेत.

नाना पटोल पुढे बोलताना म्हणाले, शेतकरी अजूनही त्रस्त आहेत. तरुणांचे हाल केले, मोठ्या प्रमाणात बेरोजगारी, महागाई आणि गरिबी वाढली. आणि त्याचाच सर्वात मोठं नुकसान भाजपला महाराष्ट्रात झाले आहे. त्यामुळं त्यांच्या पक्षातील या सगळ्या गोष्टी आहेत, आता ही बातमी बाहेर आलेली आहे, वस्तुस्थिती बाहेर आलेली नाही. ज्यावेळी या सगळ्या गोष्टी घडतील त्यावेळी यावर प्रतिक्रिया देवू, असं वक्तव्य नाना पटोले यांनी फडणवीसांच्या मंत्रिमंडळातून मुक्त करण्याच्या विधानावर केलं.

आता महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री काँग्रेसचा व्हावा ही काँग्रेस कार्यकर्त्यांची भावना कार्यकर्त्यांमध्ये उत्साह राहण स्वाभाविक आहे. गेल्या पंचवीस वर्षानंतर काँग्रेसच्या पंजा चिन्हावर उमेदवार असल्याने उत्साह आहे. चौथा नंबरच्या पक्ष आज महाराष्ट्रात पहिल्या नंबरचा पक्ष झालेला आहे. आता महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री काँग्रेसचा व्हावा ही भावना काँग्रेसच्या कार्यकर्त्यांमध्ये निर्माण होऊ नये स्वाभाविक आहे. आम्ही सर्वजण प्रयत्न करत आहोत. महाविकास आघाडी म्हणून सर्व पक्षांनी सोबत लढण्याची भूमिका आमची आहे, असा विश्वासही नाना पटोले यांनी व्यक्त केला.

बजरंग सोनवणे यांच्या विजयानंतर तालुक्यात गावोगावी आंदोत्सव

शिरूर । प्रतिनिधी

बीड लोकसभा निवडणुकीच्या चुरशीमध्ये राष्ट्रवादी शरदपवार गटाचे बजरंग सोनवणे हे साडेसहा हजार मताने विजयी झाले यामुळे शिरूर तालुक्यात महाआघाडीच्या कार्यकर्त्यांकडून व त्याबरोबर मराठा समाजाकडून गावागावामध्ये आंदोत्सव साजरा करण्यात आला आहे.तर महायुतीच्या नेते कार्यकर्त्यांनी पंकजा मुंडेच्या अनपेक्षित पराभवामुळे आत्मचिंतन करू लागले आहेत.

लोकसभा निवडणुकीचा मंगळवार दि.४ जून रोजी निकाल लागत असताना संपूर्ण महाराष्ट्राचे बीड लोकसभेच्या निकालावरती लक्ष होते. मराठा विरुद्ध ओबीसी अशा चुरशीच्या लढतीमध्ये कोण बाजी मारणार याची उत्कंठा सर्वांना लागून होती.

सोनवणेच्या विजयाची जबाबदारी जनतेने घेतली होती- खोले

बीड लोकसभा मतदारसंघांमध्ये महा आघाडीचे उमेदवार बजरंग सोनवणे हे निवडणुकीच्या रिंगणात उतरल्यापासून त्यांना निवडून आणण्याची जबाबदारी जनतेने स्वतःहून आपल्या खांद्यावर घेतली होती. जबाबदारी मोठ्या हिरारीने त्यांनी निभावली आहे. यामुळेच बजरंग सोनवणे यांचा विजय झाला आहे. हा विजय म्हणजे केवळ जनतेचाच विजय असल्याचे प्रतिक्रिया राष्ट्रवादी शरद पवार गटाचे शिरूर तालुका अध्यक्ष दीपक खोले यांनी दिली आहे.

कधी पंकजा मुंडे आघाडीवर तर कधी बजरंग सोनवणे आघाडीवर असा दिवसभर चढ-उतार राहिल्याने या निकालाबाबद संपूर्ण राज्याची उत्कंठा ताणून राहिली होती. रात्री उशिरा लागलेल्या निकालामध्ये अखेर बजरंग सोनवणे यांना विजयी घोषित केल्याने महाआघाडीच्या कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह निर्माण झाला होता. मराठा आरक्षणाच्या मुद्द्यावरून सत्ताधाऱ्यांच्या विरोधात जिल्ह्यातील मतदारांनी मतदानातून आपला रोष व्यक्त करून बजरंग सोनवणे यांना एक मुखाने मतदान केले आणि बजरंग सोनवणे यांच्या पदरात झुकते माप दिले यामुळे सोनवणे यांच्या विजय झाला या विजयाचा जिल्हाभरात काल रात्री पासून आज दिवस भर मोठा आंदोत्सव साजरा करण्यात येत आहे. शिरूर तालुक्यातील गावामध्ये मराठा समाजाच्या वतीने फटाक्यांची आतिषबाजी करून गुलाल उधळण करत आनंद उत्सव साजरा करण्यात आला. शिरूर शहरांमध्ये महाविकास आघाडीच्या कार्यकर्त्यांनी चौका चौकामध्ये फटाक्याची अतिष करून मोठा आनंदोत्सव साजरा केला आहे.तर इकडे मुंडे भक्त महायुतीच्या कार्यकर्त्यांमध्ये पंकजा मुंडे यांचा निसटता पराभव झाल्यामुळे प्रचंड निराशा पसरलेली पाहायला मिळाली अगदी आज दिवसभर अनेकांनी पंकजा मुंडे यांच्या पराभवाचे आत्मचिंतन केले आहे.

जाहीर प्रगटन

बीड येथील श्रीमती. सुनयना एस. पिंगळे दिवाणी न्यायाधीश व.स्तर, बीड ता. जि. बीड यांचे न्यायालयात किरकोळ दि. अर्ज क. ७५२/२०२४

शिरीषकुमार मारोती जोगदंड वि. निरंक ॲड. एन. के. शिरसट वकील

अर्जदार :- १. शिरीषकुमार पि. मारोती जोगदंड, वय ७५ वर्षे, धंदा शेती, रा. वानगांव, ता.जि. बीड.२. पुष्पाताई भ्र. सुधाकर भागडे, वय ६८, धंदा घरकाम, रा. तांदुळवाडी (घाट), ता.जि. बीड. ३. राजूबाई भ्र. सखाराम शिंदे, वय ४९ वर्षे, धंदा घरकाम, रा. विठ्ठल पेठ गल्ली, नेकनूर, ता.जि. बीड. ४. मोहर मारुती जोगदंड, वय ४८ वर्षे, धंदा घरकाम, रा. वानगांव, ता.जि. बीड. ५.किसकिंदा भ्र. आश्रुबा खामकर-मयत-वारस ५-१. सतिश पि. आश्रुबा खामकर, वय ३४, धंदा शेती, रा. वडगांव (क.), पो. कळसंबर, ता.जि. बीड. ५-२. अजिनाथ पि. आश्रुबा खामकर, वय ३१, धंदा शेती, रा. वडगांव (क.), पो. कळसंबर, ता. जि. बीड. ५-३. सिध्देश्वर पि. आश्रुबा खामकर, वय २५, धंदा शेती, रा. वडगांव (क.), पो. कळसंबर, ता.जि. बीड.

विरूध्द निरंक

मागणी :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार मयताचे कायदेशिर वारस म्हणुन प्रमाणपत्र मिळणे बाबत..

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात वरीलप्रमाणे अर्ज दाखल केला असून, अर्जदार क्र. १ हा मयत मुक्ताबाई मारुती जोगदंड यांचा मुलगा असून, अर्जदार क्र. २ ते ५ या मयताच्या विवाहीत मुली आहेत. अर्जदार क्र. ५ किसकिंदा भ्र. आश्रुबा खामकर ही मयत्त मुलगी असून अर्जदार क्र. ५-१ ते ५-३ हे मयत मुक्ताबाई हिचे नातू म्हणजे अर्जदार क्र.५ चे मुले आहेत. मयत नामे मुक्ताबाई मारुती जोगदंड यांचा मृत्यु दिनांक ०२-०३-२०२२ रोजी मौजे वानगाव, ता. जि. बीड येथे झाला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहु मयत नामे मुक्ताबाई मारुती जोगदंड, या जाहिरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरह मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट सदरहु अर्जदार हयांचे हक्काबददल लागलीच पुरावा घेवुन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना सदरहु, मयत नामे मुक्ताबाई मारुती जोगदंड रा. वानगाव, ता. जि. बीड यांचे अर्जदार हेच मयताची कायदेशीर वारस म्हणून घोषीत करून अर्जदारास वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक २७/०५/२०२४ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयाच्या शिक्कयानिशी दिले.

पुढील तारीख १५/०६/२०२४

स्वाक्षरीत/-
क.लिपिक

कोर्टाचा शिक्का

स्वाक्षरीत/-
अधिक्षक
दिवाणी न्यायालय व.स्तर बीड

एक शेतकरी, एक डीपी योजनेचा खेळखंडोबा

शेतकऱ्यांचा विकास व्हावा यासाठी केंद्र व राज्य सरकार विविध योजना राबवत असते. वीज आणि पाणी हे शेतीसाठी महत्वाचे घटक आहेत. मात्र खंडित वीजपुरवठा होत असल्याने शेतकऱ्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागत होता. त्यावर मात करण्यासाठी राज्य सरकारची शेतकऱ्यांसाठी एक शेतकरी, एक डीपी ही योजना राबवली आहे. मात्र या योजनेला म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही, त्यामुळे ही योजना कागदावरच राहिली असल्याचे पाहायला मिळत आहे.

देशातील शेतकरी सुजलाम् सुफलाम् व्हावा, शेती व शेतकऱ्यांचा विकास व्हावा, या दृष्टिकोनातून राज्य व केंद्र सरकारकडून अनेक महत्वाच्या योजना राबविल्या जातात. या योजनांच्या माध्यमातून शेतीविषयक कामे करताना शेतकऱ्यांना सुलभता यावी तसेच आर्थिक मदत व्हावी, हा त्यामागचा उद्देश समोर ठेऊन अशा अनेक योजनांची आखणी केली जाते. यातील बऱ्याचशा योजना अनुदान स्वरूपातील असल्याने याचा शेतकऱ्यांना फायदा होतो.

काय आहे योजनेचे स्वरूप : अगदी त्याच पद्धतीने राज्य सरकारची शेतकऱ्यांसाठी एक शेतकरी, एक डीपी ही योजना फायदेशीर ठरत असली तरीदेखील या योजनेचा प्रचार व प्रसार पाहिजे तेवढ्या प्रमाणात झाला नसल्याने शेतकऱ्यांना या योजनेविषयी फारशी माहिती नाही. त्यामुळे ही योजना कागदावरच असल्याचा प्रत्यय येत आहे. या योजनेद्वारे शेतकऱ्याला त्यांच्या शेतात एक स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर उभा करून दिला जातो. जेणे करून शेतकऱ्यांना नियमित अखंडित वीजपुरवठा चालू राहिल व पिकाला वेळीच पाणी देता येईल. हा त्या पाठीमागचा उद्देश आहे. या योजनेच्या माध्यमातून शेतकऱ्यांना स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर घेण्यासाठी स्वतःचा हिस्सा भरणे गरजेचे आहे.

योजनेच्या खर्चाचे विवरण : जर शेतकरी सर्वसामान्य प्रवर्गातील असेल तर ७ हजार रुपये प्रति एचपी तसेच शेतकरी एसटी प्रवगतील असेल तर ५ हजार रुपये प्रति एचपी इतकी रक्कम भरावी लागेल, ही रक्कम भरल्यानंतर स्वतंत्र ट्रान्सफॉर्मर घेण्यासाठी उर्वरित रक्कम राज्य सरकारकडून अनुदान स्वरूपात दिली जाते. याव्यतिरिक्त शेतात ट्रान्सफॉर्मर बसविण्यासाठी जो अतिरिक्त खर्च येतो, तो राज्य सरकारकडून अनुदान स्वरूपात संबंधित लाभार्थी शेतकऱ्यांना मंजूर केला जातो. अशा शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्वाच्या योजना असताना महावितरण कर्मचाऱ्यांच्या उदासीनतेमुळे एक शेतकरी, एक डीपी या योजनेची प्रभावीपणे अंमलबजावणी होताना दिसत नाही. सरकारी कार्यालयातील अधिकाऱ्यांची अनास्था कारणीभूत ठरत असल्याने अनेक महत्वाच्या योजना आजही कार्यालयाच्या लालफितीत अडकल्या आहेत, हे ग्रामीण भागातील वास्तव नाकारता येणार नाही. त्यापैकीच ही एक योजना असल्याचे बोलले जात आहे.

दिन विशेष

महत्वाच्या घटना

१५३९ : बक्सर च्या जवळ चौसा या ठिकाणी अफगाण शासक शेरशाह सुरी आणि मुघल शासक बादशाहा हुमायू यांच्यात झालेल्या लढाईत बादशाहा हुमायू यांचा पराभव झाला.
१८९३ : महात्मा गांधीं यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.
१९३८ : डी. सी. ४ प्रकारच्या विमानाचे प्रथम उड्डाण.
१९६५ : अमेरिकेच्या सर्वोच्च न्यायालयाने परिणित दांपत्याने गर्भनिरोधक साधने वापरणे कायदेशीर ठरवले.
१९७५ : क्रिकेटच्या पहिल्या विश्वकरंडक स्पर्धेस इंग्लंडमध्ये सुरुवात झाली.
१९७९ : रशियातील कापुस्तिनयार येथून भास्कर-१ उपग्रहाचे प्रक्षेपण.
१९८१ : इस्रायलने इराकची ओसिराक परमाणू भट्टी नष्ट केली.
१९८५ : विम्बल्डन पुरुष एकेरीचे विजेतेपद १७ व्या वर्षी मिळवणारा बोरिस बेकर हा सर्वात तरुण खेळाडू बनला.
१९९१ : फिलिपाइन्स मधल्या माउंट पिनाटुबो ज्वालामुखीचा उद्रेक.
१९९३ : महात्मा गांधीं यांनी सविनय कायदेभंगाची चळवळ सुरू केली.
१९९४ : नाणे निधीच्या उपव्यवस्थापकीय संचालकपदी अर्थतज्ज्ञ प्रभाकर नार्वेकर या प्रथमच एका भारतीयाची नियुक्ती झाली.
२००१ : युनायटेड किंग्डम मधील निवडणुकांत टोनी ब्लेरच्या नेतृत्वाखाली लेबर पार्टीला मोठे बहुमत.
२००४ : शिरोमणी अकाली दल (लाँगोवाल) या राजकीय पक्षाची स्थापना.
२००६ : अल कायदाचा इराकमधील म्होरक्या अबू मुसाब अल झरकावी हा अमेरिकन हवाईदलाने केलेल्या बॉम्बहल्ल्यात ठार झाला.

जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८३७ : अलोइस हिटलर, एडॉल्फ हिटलरचे वडील. (मृत्यू: ३ जानेवारी १९०३)
१८३७ : अलोइस हिटलर, एडॉल्फ हिटलरचे वडील.
१९१३ : लेखक टीकाकार मंगेश विठ्ठल राजाध्यक्ष यांचा जन्म. (मृत्यू: १९ एप्रिल २०१०)
१९१४ : दिग्दर्शक, पटकथाकार, लेखक व पत्रकार ख्वाजा अहमद तथा के. ए. अब्बास यांचा जन्म. (मृत्यू: १ जुन १९८७)
१९१७ : अमेरिकन गायक, संगीतकार निर्माते डीन मार्टिन यांचा जन्म. (मृत्यू: २५ डिसेंबर १९९५)
१९४२ : लिबियाचा हुकूमशहा मुअम्मर गडाफी यांचा जन्म. (मृत्यू: २० ऑक्टोबर २०११)
१९४९ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायाधीश सुरिंदरसिंग निज्जर यांचा जन्मदिन
१९५७ : भारतीय सर्वोच्च न्यायालयाचे सेवानिवृत्त सरन्यायाधीश व भारतीय सशस्त्र सैन्य न्यायाधिकरणाचे विद्यमान अध्यक्ष न्यायमूर्ती राजेंद्र मेनन यांचा जन्मदिन.
१९५९ : भारतीय अर्थशास्त्रज्ञ आणि भारत सरकारचे माजी मुख्य आर्थिक सल्लागार अरविंद सुब्रमण्यम यांचा जन्मदिन.
१९७४ : महेश भूपती, भारतीय टेनिसपटू.
१९७५ : पद्मश्री पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय चित्रपट व टेलीव्हिजन मालिका निर्माता आणि दिग्दर्शिका एकता कपूर यांचा जन्मदिन.
१९८१ : अमृता राव, मराठी चित्रपट अभिनेत्री.

मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२१ : रोमेनियाचे क्रांतिकारी ट्युडोर व्लादिमिरेस्कु यांचे निधन.
१९५४ : ब्रिटीश गणितज्ञ आणि संगणकशास्त्रज्ञ ऍलन ट्युरिंग यांचे निधन. (जन्म: २३ जुन १९१२)
१९७० : ब्रिटिश साहित्यिक इ. एम. फोर्स्टर यांचे निधन. (जन्म: १ जानेवारी १८७९)
१९७८ : रोनाल्ड जॉर्ज ब्रेफोर्ड नॉरिश (चित्रित), ब्रिटिश रसायनशास्त्रज्ञ व नोबेल पारितोषिक विजेता.
१९९२ : डॉ. स. ग. मालशे, मराठी वाङ्मयाचे अभ्यासक आणि संशोधक.
१९९२ : नासकार चे सहसंस्थापक बिल फ्रान्स सीनियर यांचे निधन. (जन्म: २६ सप्टेंबर १९०९)
१९९८ : शशिकांत नार्वेकर, गोमंतक मराठी अकादमीचे अध्यक्ष.
१९९९ : बालसाहित्यिक गोपीनाथ तळवलकर यांचे निधन. (जन्म: २९ नोव्हेंबर १९०७)
२००२ : बी. डी. जत्ती, भारतीय उपराष्ट्रपती.
२०२० : चिरंजीवी सर्जा (भारतीय कन्नड चित्रपट अभिनेते, जन्म: १ ऑक्टोबर १९८४).

बटाट्याचे 'हे' वाण देते दुष्काळ, पूर स्थितीला तोंड

संशोधकांनी बटाट्याचे असे एक वाण तयार करण्याचा दावा केलेला आहे, की जे पिकांवर पडणाऱ्या साथ रोगांचा सामना तर करूच शकेल त्याचबरोबर दुष्काळालाही तोंड देऊ शकेल. हे वाण क्षारयुक्त जमिनीतही घेता येईल, असे संशोधकांचे म्हणणे आहे. १८४५ मध्ये आयर्लंडमध्ये बटाट्यावरील ''लेट ब्लाइट'' या रोगामुळे तेथील पूर्ण पीक नष्ट झाले होते. मागील वर्षी डिसेंबरमध्ये पंजाबच्या काही भागात या रोगाने कहर केला होता. काही भागात तर या रोगामुळे बटाट्याचं ८० टक्के पीक नष्ट झाले होते.

या रोगाचा जीवाणू उष्ण वातावरणात वेगाने पसरतो. मागील काळात पेरूतील अँडीज पर्वतरांगेतील उंच प्रदेशात हवामान उष्ण झाल्यामुळे या जिवाणूमुळे तिथले बटाट्याचे पीक नष्ट झाले आहे. 'पेरू' येथे बटाट्याच्या उत्पादनावर संशोधन करणाऱ्या इंटरनॅशनल पोटॅटो सेंटर या संशोधन संस्थेचे वैज्ञानिक, स्वत:हून 'लेट ब्लाइट' रोगाचा सामना करू शकेल अशी बटाट्याची नवी जात शोधण्याचा प्रयत्न करत आहेत.

बटाट्याची नवी जात : माटिल्डे

वैज्ञानिक बटाट्याच्या अशा वन्य जातींच्या वैशिष्ट्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न करत होते ज्या जातींची लागवड केली जात नाही. वैज्ञानिकांना बटाट्याच्या काही वन्य जातींमध्ये या रोगाशी लढण्याचे गुण आढळल्यानंतर त्यांनी बटाट्याची वन्य जात आणि शेतीत लागवड केली जाणारी जात यामध्ये क्रॉस ब्रीडिंग केले आणि या माध्यमातून बटाट्याच्या वेगवेगळ्या प्रकारच्या जाती विकसित केल्या. वैज्ञानिकांच्या या नव्या शोधाचा परिणाम म्हणजे 'माटिल्डे' ही बटाट्याची नवी जात असून, त्याला वैज्ञानिकांनी २०२१ मध्ये प्रसारित केली होती. या जातीच्या लागवडीसाठी शेतकऱ्यांना आता वेगळ्या कीटकनाशकांची आवश्यकता नसते. कारण बटाट्याच्या या जातीवर 'लेट ब्लाइट' रोगाचा परिणाम होत नाही. बटाट्याच्या या नव्या जातींच्या चाचणीसाठी स्थानिक शेतकऱ्यांची मदत घेण्यात आली. त्या शेतकऱ्यांनी फार छोट्या प्रमाणात या नव्या जातींची लागवड केली.

नवीन जातींच्या चाचण्या : माटिल्डे ही बटाट्याची नवी जात विकसित करण्यासाठी क्रॉप ट्रस्ट पेरूतील वैज्ञानिकांबरोबर काम करत होता. याशिवाय ही संस्था इतर अनेक पिकांच्या नव्या जातींवरदेखील काम करते आहे. कोणत्याही एका रोगा संदर्भातील रोगप्रतिकारक क्षमतेची बाब सर्वसाधारणपणे एका जनुकाशी निगडीत असते. मात्र दुष्काळ, जमीन अधिक क्षारपट असणे यासारख्या अडचणींतून मार्ग काढण्यासाठी वैज्ञानिकांना शंभर पेक्षा अधिक जनुकांना तोंड द्यावे लागते. दुष्काळात रोपांनी तग धरावी यासाठी वैज्ञानिक वेगवेगळ्या पद्धती अंमलात आणण्याबाबत विचार करतात. उदाहरणार्थ दुष्काळाच्या तडाख्यातून वाचण्यासाठी रोपाला लवकर फूलं येणं, रोपाच्या पानातून पाण्याचे होणारे बाष्पीभवन थांबवणे, रोपाची मुळे लांब असणे जेणेकरून रोप अधिक पसरू शकेल आणि पाण्यापर्यंत पोहोचू शकेल.

ठिबक संचाच्या देखभालीसाठी कराव्या लागणाऱ्या आम्ल व क्लोरिन प्रक्रिया

कमी पाण्यात अधिक उत्पादन मिळवण्यासाठी सूक्ष्म सिंचनाचा भाजीपाला व फळे पिकात अवलंब केला जातो. परंतु, आता उसासारख्या पिकात ठिबक सिंचनाचा वापर होताना दिसत आहे. विशेष म्हणजे अनेक शेतकरी सध्या पावसाळा सुरु होण्याच्या अगोदरच काही पिकांची आगाऊ लागवड करत असतात. ज्यामुळे सध्या ठिबकचा वापर मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सूक्ष्म सिंचन पद्धती अर्थात ठिबक सिंचन संचाची काळजी व देखभाल घेणे गरजेचे खूप असते. ठिबक सिंचन संचाची कार्यक्षमता कायम राखण्यासाठी संचाची वेळोवेळी देखभाल करणे गरजेचे आहे. जेणेकरून वेळेची, ऊर्जेची बचत होते व संचाचे जीवनमान वाढते.

कशी असते आम्ल प्रक्रिया? : लॅटरल व ड्रीपमध्ये साचलेले क्षार जसे कॅल्शियम कार्बोनेट, मॅग्नेशियम कार्बोनेट किंवा फेरिक ऑक्साइड ठिबक सिंचन संचाचे कार्य मंदावतात अथवा बंद पाडतात. हे जमा झालेले क्षार स्वच्छ करण्यासाठी आम्ल प्रक्रिया करावी लागते. त्यासाठी सल्फ्युरिक आम्ल (६५ टक्के), हायड्रोक्लोरिक आम्ल (३६ टक्के), नायट्रिक आम्ल (६० टक्के) किंवा फोसफेरीक आम्ल (८५ टक्के) यापैकी कुठलेही उपलब्ध होणारे आम्ल वापरू शकतात.

द्रावण तयार करण्याच्या पद्धती : एका प्लॅस्टिकच्या बादलीमध्ये एक लिटर पाणी घेऊन त्यात ॲसिड मिसळत जावे. आम्ल मिसळताना मध्येमध्ये पाण्याचा सामू पीएच मीटर ने आता लिटमस पेपरने मोजावा. पाण्याचा सामू तीन ते चार होईपर्यंत (लिटमस पेपर चा रंग फिकट गुलाबी होईपर्यंत) पाण्यात ॲसिड मिसळत जावे. पाण्याचा सामू तीन ते चार करण्यासाठी किती ॲसिड लागले ते लिहून ठेवावे. पंप चालू केल्यानंतर संचाच्या शेवटचा ड्रीपर पर्यंत पाणी पोहोचण्यासाठी किती वेळ लागतो याची नोंद घ्यावी. साधारणतः पंधरा मिनिटे वेळ लागतो असे गृहीत धरावे.

कशी असते क्लोरिन प्रक्रिया : ठिबक संचातील पाईप, लॅटरल, दिफर्स यामध्ये झालेल्या शेवाळ वाढीमुळे संचाची कार्यक्षमता मंदावते. ठिबक सिंचन संच यामध्ये जैविक व सेंद्रिय पदार्थांचे झालेली वाढ रोखण्यासाठी क्लोरिन प्रक्रियाचा उपयोग होतो. यासाठी ब्लिचिंग पावडरचा उपयोग करावा. त्यामध्ये ६५ टक्के मुक्त क्लोरीन असतो. अथवा सोडियम हेपो क्लोराईड वापरावे. त्यामध्ये १५ टक्के मुक्त क्लोरीन असतो. ब्लिचिंग पावडर हा सर्वात स्वस्त व सहज बाजारात उपलब्ध होणारा क्लोरीनचा स्रोत आहे. परंतु सिंचनाच्या पाण्यामध्ये कॅल्शियमचे प्रमाण (२० पीपीएम पेक्षा जास्त) जास्त असल्यास ब्लिचिंग पावडर वापरू नये. आम्ल प्रक्रियाची गरज असल्यास टीक्लोरिन प्रक्रिया पूर्वीच करून घ्यावी. कारण बाहेर पडणारा क्लोरीन वायू विषारी असतो.

बुटक्या नारळाची शेती करा आणि कमवा लाखो रुपये

नारळाच्या झाडाला माड , नारळ, कल्पतरू अशा अनेक नावांनी ओळखले जाते. नारळाच्या झाडाचे प्रतेक अवयव कामात येतात, कोणताही पार्ट अनुपयोगी नाही असा हा कल्पतरू बहुपयोगी आहे.

लागवडीसाठी जमीन : नारळ लागवडीसाठी कोणत्याही जमिनीची निवड आपण करू शकता ,फक्त आपल्याला पाण्याची उपलब्धता असावी, कारण जमीन हलकी असली तरी चालेल परंतु पाणी भरपूर असावे. नारळ लागवडिपूर्वी जमिनीची ट्रॅक्टर च्या साह्याने चांगली खोल पूर्व मशागत करून घ्यावी व एक एकर जमिनीमध्ये १२ बाय १५ असे अंतर ठेऊन खड्डे खोदून घ्यावे व आपल्याकडे शेणखत वैगेरे जे असेल ते शेतात किंवा खड्ड्यात टाकून घ्यावे. लागवड करण्यापूर्वी निंबोळी पेंड आणि बुरशीनाशक टाकून खड्डे व्यवस्थित भरून घ्यावे.

लागवडीसाठी कलम : कलम आपण घरी सुद्धा तयार करू शकता परंतु नर्सरी मधून कलम घेतल्यास खात्रीशीर कलम आपणास मिळू शकते आणि कलम खात्रीशीर असल्यास उत्पन्न देखील चांगले मिळते. कलम खरेदी करताना विशेष काळजी घ्यावी जेणेकरून फसवणूक होणार नाही.

नारळाच्या जाती : नारळाच्या सुधारित जातीमध्ये उंच वाढणाऱ्या जाती व ठेंगू जाती असे दोन प्रकार पडतात. त्यापैकी उंच वाढणाऱ्या जातीमध्ये प्रताप, वेस्ट कोस्ट टोल किंवा बानवली, लक्षदीप ऑर्डिनरी (चंद्र कल्प), लक्षदीप मायको, फिलिपिन्स ऑर्डिनरी व केरा बस्तर या ६ जाती महत्त्वाच्या आहेत. नारळाच्या ठेंगु जातीमध्ये चौघाट ग्रीन डॉर्फ, चौघाट ऑरेंज डॉर्फ, मलायन ग्रीन डॉर्फ आणि मलायन येलोडॉर्फ व गंगाबोडम या ४ जाती महत्त्वाच्या आहेत.

खत व्यवस्थापन : नारळाच्या झाडांना रासायनिक खत देण्याची आवश्यकता भासत नाही , परंतु शेण खत तसेच सेंद्रिय खत दिल्यास उत्पन्नात अवश्य भर पाहायला मिळेल.

पाणी व्यवस्थापन : नारळ या पिकासाठी पाण्याची गरज इतर पिकांपेक्षा जरा जास्तच लागते. त्यासाठी झाडाच्या बाजूला सरी तयार करून सरी पद्धतीने पाणी देऊ शकता. किंवा ठिबक सिंचन प्रणालीचाही वापर करू शकता. पाण्याचा योग्य आणि काटेकोर वापर केल्यास शेतकरी कमी पाण्यात सुद्धा नारळ शेती यशस्वीपणे करता येते.

नारळापासून एकरी उत्पन्न : १२ बाय १५ फुटावर लागवड केल्यास एक एकर जमिनीमध्ये नारळाची २५० झाडे बसतात. एका झाडाला सरासरी एक वर्षात ३०० ते ५०० नारळ लागतात परंतु आपण कमीत कमी वर्षाला एक झाडाला १०० नारळ पकडले आणि आणि एका नारळाला ५० ते ६० रुपये भाव मिळतो परंतु आपण फक्त २० रुपये प्रती नारळ प्रमाणे भाव पकडला तरी चांगले उत्पन्न निघते.

आंतर पीक : नारळ बागेमध्ये भाजीपाला वर्गीय पिके घेऊ शकता याशिवाय शेतकरी नारळ बागेमध्ये मध माशांचे बॉक्स ठेऊ शकता आणि मधमाशी पालन करू शकता. मधमाशी पालन सोबत आपण गांवराण कोंबडी पालन सुद्धा करू शकता ज्यामधून तुम्हाला अंडी आणि मास तसेच पिल्ले सुद्धा मिळतील यामधून तुम्हाला दुहेरी आर्थिक फायदा मिळेल.

परळी मतदार संघात ग्रामसडक योजनेची कामे बोगस

ग्रामस्थांच्या तक्रारीकडे मुख्यमंत्री सडक योजनेवरील अभियंत्याचे दुर्लक्ष

पुस ते गोल्टा वस्ती रस्ता थातुरमातूर करत गुत्तेदाराचा बील उचलण्याचा आटापिटा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रतिनिधी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतर्गंत परळी मतदार संघामध्ये मोठ्या प्रमाणावर कामे सुरू असून ही कामे पालकमंत्र्यांच्या निकटवर्तीयांकडे असल्यामुळे सबंधीत विभाग रस्त्याच्या दर्जाकडे दुर्लक्ष करीत असल्याचे तक्रारी ग्रामस्थ व शेतकरी करू लागले आहेत. पुस ते गोल्टा पाच किलो मीटरचा रस्ता थातुर-मातूर करत तीन कोटी रूपये लाटण्याचा गुत्तेदाराचा प्रयत्न सुरू आहे.

बीड जिल्ह्यात मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतर्गंत विविध कामातील दर्जा बाबत बीडचे आ.संदीप क्षीरसागर यांनी तक्रारी केल्यानंतर मुख्य अभियंत्यांनी गुणवत्ता निरिक्षकाचा अहवाल मागविला आहे. परंतु जिल्ह्याचे पालकमंत्री असलेले धनंजय मुंडे यांच्या मतदार संघात मोठ्या प्रमाणावर मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेचे काम सुरू आहेत. ही कामे त्यांनी त्यांच्या निकटवर्तीयांनाच दिल्यामुळे कामाच्या दर्जाबाबत प्रश्न चिन्ह निर्माण झाला आहे. पुस ते गोल्टा या रस्त्यासाठी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेतून पाच किलो मीटरच्या अंतरासाठी तीन कोटी रूपयांचा निधी मंजुर करण्यात आला होता. या निधीतून गाव

पातळीपासून अर्धा किलोमीटर सिमेंट रस्ता व नाल्याची निविदेत तरतुद आहे. तर त्या पुढील अंतरामध्ये बी.बी.एम., हॉटमिक्स साईट पट्टया, अशा तरतुद असतानाही केवळ थातुर-मातूर आठ फुटावर बीबीएम आंथरून काम आटोपल्याचा देखावा गुत्तेदार करू लागले आहेत. आठ फुटाच्या रस्त्यातून दोन वाहने कसे पास होणार असा प्रश्न वस्ती वरील नागरिक उपस्थितीत करू लागले आहेत. या रस्त्यालगत साईड पट्याही नसल्यामुळे समोरून वाहन आले तर ते वाह कोट्यावधी रूपये शासनाकडून सामान्यांच्या जनजीवनाच्या येत असले तरी हा निधी पालकमंत्री स्वतःच्या कार्यकर्त्यांचेच चांगभले व्हावे असे काही प्रकार परळी मतदार संघात सुरू आहेत. तत्कालीन पालकमंत्री आतुल सावे यांनी डीपीडीसी मधून पुस ते पदमावती देवी मंदिरापर्यंत हॉटमिक्स ने रस्ता करण्यासाठी दहा लाखांचा निधी मंजूर केला या रस्त्यावर अद्यापही ना खडी ना डांबर पडले आहेत. परंतु संबंधीत गुत्तेदार हे बील उचलण्याच्या तयारी असल्याची तक्रार ग्रामपंचायत सदस्य कल्याण उदार यांनी मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेकडे केली आहे.

दोन्ही रस्त्यावरील अभियंता नॉटरिचेबलच

पुस ते गोल्टा या तीन कोटी रूपयांच्या रस्त्याचे काम फड नामक अभियंत्याकडे आहे. परंतु हा अभियंता एकाही वेळेस कामाच्या ठिकाणी हजर झालेला नाही. निविदेप्रमाणे काम होत आहे का नाही? याची त्यांना कल्पना देखील नाही मात्र हे बील मंजूर करण्यासाठी ते आटापिटा करू लागले आहेत. - शिवाजी सिरसट, ज्येष्ठ नेते राष्ट्रवादी काँग्रेस

केवायसी केल्याशिवाय घरगुती गॅस मिळणार नाही

गॅस वितरक कंपनीकडून ग्राहकांना सुचना

अंबाजोगाई । प्रतिनिधी

केंद्र सरकारने विविध योजना घेण्यासाठी ई-केवायसी अधिकृत केल्यामुळे बोगस लाभार्थ्यांना यातून चाप बसणार आहे. घरगुती गॅसची ई-केवायसी केल्याशिवाय सिलेंडर मिळणार नाही. असे आदेश कंपन्यांनी दिल्यामुळे गॅस ग्राहक अडचणीत सापडले आहेत. गॅस पुरवठ्यामध्ये पारदर्शकता अनावी किंवा मुळ लाभार्थ्यांना त्याचा फायदा मिळावा या हेतुने कंपन्यांनी ई-केवासयी बंधनकारक केली आहे. केवासयी आपआपल्या गॅस एजन्सी कडून मोफत करून दिली जात आहे. मात्र जे गॅस धारक केवासयी करणार नाहीत. त्यांचे गॅस बंद केले जाणार आहेत. राज्यात घरगुती गॅस धारकांनी तात्काळ आपले गॅस जोडणी बायोमॅट्रीक किंवा ईकेवासी करून घेण्याच्या सुचना केंद्र सरकारने दिल्या आहेत. भविष्यात गॅस पुरवठा सुरळीत राहण्यासाठी केवायसी व सुरक्षा तपासणी करून घेणे गरजेचे आहे. गॅस

केवायसी न केल्यास ग्राहक सबसिडी पासुन वंचित राहणार. भविष्य काळात गॅस सबसिडी देणे सुरूवात झाल्यास ई-केवायसी व सुरक्षा तपासणी झालेल्या ग्राहकांनाच गॅस अनुदान मिळण्यास सुलभ होणार आहे. सध्या फक्त उज्वला गॅस कनेक्शन धारकांना तीनशे रूपयांची सबसिडी त्यांच्या बँक खात्यात जमा होते. केवासयी व सुरक्षा तपासणी न झाल्यास अनुदान ही बंद होण्याची शक्यता आहे.

- रामचंद्र शिंदे, व्यवस्थापन आनंद गॅस सर्व्हीसेस अंबाजोगाई

कंपन्याकडून केवासयी बंधनकारक केल्यामुळे ई-केवासीसाठी हाताच्या बोटाचे ठसे किंवा मोबाईलवर फेसरिडींग करणे गरजेचे आहे. आपले आधार कार्ड, झेरॉक्स गॅस वितरकाकडे बायोमॅट्रीक करता येणार आहे. जे गॅस वितरक अशा अधिकृत प्रतिनिधीकडून केवासयी करून घ्यावी. त्यासाठी प्रत्यक्ष ग्राहकांनी आपआपल्या गॅस एजन्सीच्या ठिकाणी उपस्थित राहणे गरजेचे आहे. केवासयी करताना कोणती रक्कम किंवा शुल्क आकारले जाणार नाहीत. हे बायोमॅट्रीक पुर्णपणे मोफत केले जाणार आहे. ग्राहकांनी तात्काळ केवायसी करून घेणे बंधनकारक आहे.

देशात गॅस गळतीचे प्रमाण वाढत असल्याने गॅस सिलेंडर व सेगडीचे वेळोवेळी तपासणी केली जात नाही.त्यामुळे देशात गॅस सिलेंडरच्या स्फोटाने अपघात वाढत आहेत. याला आळा घालण्यासाठी आपल्या गॅस उपकरणाची सुरक्षा तपासणी किमान पाच वर्षात तरी केली पाहिजे. न केल्यास गॅसच्या अपघाताचे प्रमाण वाढणार आहे. त्यासाठी गॅस ग्राहकांनी आपल्या घरातील उपकरणाची वेळोवेळी तपासणी करावी.

- अॅड.आनंत जगतकर, गॅस सर्व्हिसेस अंबाजोगाई

उर्दूच्या भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्न सुरूच राहतील-हसीन अख्तर

बीड । प्रतिनिधी

तंजीम तरक्की उर्दू ही गेल्या अनेक वर्षे उर्दू भाषा आणि साहित्याच्या अस्तित्वासाठी आणि हितासाठी प्रयत्नशील असलेली संस्था. संस्थेचे अध्यक्ष, सुप्रसिद्ध कथालेखक आणि स्तंभलेखक सय्यद हसीन अख्तर उर्दूसाठी नेहमीच मोलाची पावले उचलतात. उर्दू भाषा आणि साहित्याच्या विकास आणि संवर्धनासाठी विविध उपक्रमांचे आयोजन हे यांचे वैशिष्ट्य आहे. नुकताच बारावीचा निकाल जाहीर झाला, त्या पार्श्वभूमीवर '' तंजीम तरक्की उर्दू '' संस्थेने उर्दू विषयात विशेष गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांचा भव्य सत्कार सोहळा आयोजित केला होता.

एच एस सी बोर्डात उर्दु विषयात ९६ गुण मिळवणारा विद्यार्थी पठाण फुरकान फिरोज खान, ९५ गुण मिळवणारी शेख अनम शेख एजाज,

९० गुण मिळवणारी पठाण गुलनाज खान गुलबाज खान यांच्यासह सय्यदा अयमान आरा सय्यद समीउद्दीन, शेख शगुफ्ता जबीन शेख अमजद आणि इतर विद्यार्थी यांचे प्रमाणपत्र, पदके, पुष्पगुच्छ आणि भेटवस्तू देऊन नव रंग प्रिंटिंग प्रेस परिसर येथे दुपारी ०१ वाजता सत्कार करण्यात आले. यावेळी अध्यक्षीय भाषण करताना तंजीम तरक्की उर्दू संस्थेचे अध्यक्ष सय्यद हसीन अख्तर म्हणाले की, उर्दूच्या संवर्धनासाठी सातत्याने प्रयत्न केले जातील आणि अधिक गतीने पावले उचलली जातील. यावेळी काझी मुजीबुर रहमान यांनी प्रास्ताविक केले, या वेळी तंजीम तरक्की उर्दू संस्थेचे सचिव डॉ.सिराज खान आरजू, नव रंग प्रेसचे मालक मिर्झा जफरउल्ला बेग, सोफटेक कॉम्प्युटर्सचे एमडी सय्यद रफिक, शासकीय कंत्राटदार मिर्झा शकील बेग, मौलाना आझाद विचार मंचचे जिल्हाध्यक्ष काझी मुजीबुर रहेमान, मिर्झा परवेज बेग, मिर्झा मजहर बेग आदी मान्यवर उपस्थित होते.

योगेश्वरी महाविद्यालयाचे नीट परीक्षेत घवघवीत यश

अंबाजोगाई

शिक्षण क्षेत्रात अग्रेसर असलेल्या योगेश्वरी शिक्षण संस्था संचलित योगेश्वरी महाविद्यालयाचे नीट परीक्षा (२०२४) मध्ये घवघवीत यश प्राप्त केले असून या नीट परीक्षेत ६८५ गुण घेऊन वैभव शंकर गायके तर ६१५ गुण घेऊन अरफाज नासिर शेख यांनी विशेष प्राविण्या सह यश मिळविले आहे या परीक्षेत श्रुती नानासाहेब जाधव, रेवती उमाकांत आकुसकर, ऋतुजा जाधव, काझी सना, राजकुमार किरवले, श्रुती जाधव, आदिती घुले, नम्रता हरकल, अमोल केंद्रे, आकांक्षा भांगे, मुद्रा कुलकर्णी आरती गायकवाड, श्रुती गायके, वैजनाथ लुगडे, नारायण तेरखेडकर, सुमती शिंदे, आदी विद्यार्थ्यांनी कौतुकास्पद आणि उल्लेखनीय यश संपादन करून महाविद्यालयाला बहुमान मिळवून दिला आहे. या सर्व विद्यार्थ्यांचे योगेश्वरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष चंद्रशेखर बर्दापूरकर उपाध्यक्ष जी. बी. व्यास,कार्यकारी उपाध्यक्ष अॅड. जगदीश चौसाळकर,सचिव कमलाकर चौसाळकर, सहसचिव भीमाशंकर शेटे, कोषाध्यक्ष शैलेश वैद्य,विभाग प्रमुख अभिजीत लोहिया व इतर संचालक, प्राचार्य एम.व्ही.कानिटकर आदीसह प्राध्यापक, कर्मचारी आदींनी अभिनंदन केले आहे.

कोलंगडे यांच्या एकसष्ठीनिमित्त विविध कार्यक्रम-जाधव

बीड । प्रतिनिधी

गेल्या ४० वर्षापासून सामाजिक, राजकीय क्षेत्रासह विविध क्षेत्रात कार्यरत असणारे शिवसंग्राम चे ज्येष्ठ नेते प्रभाकर कोलंगडे यांच्या एकसष्ठी निमित्त अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन दिनांक १३ जून गुरुवार रोजी समर्थ मंगल कार्यालय, नगर रोड, बीड येथे करण्यात आले आहे. अशी माहिती शिवसंग्रामचे युवा नेते मनोज जाधव यांनी दिली आहे.

बीड येथील मूळ रहिवासी असलेले प्रभाकर कोलंगडे यांनी आपल्या जीवनाची सुरुवात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतून केली, यात आपले महाविद्यालयीन जीवनात त्यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांनी प्रेरित होऊन शिवसेनेच्या माध्यमातून समाजकारण आणि राजकारणाची सुरुवात केली. पुढे शिवसेनेच्या माध्यमातून त्यांनी अनेक गरजू, गोरगरिबांना मदतीचे हात देत आपले समाजकार्य अविरत चालू ठेवले पुढे २०१४ नंतर ते लोकनेते विनायकराव मेटे यांच्या शिवसंग्राम संघटनेत सामील होत त्यांनी सामाजिक व राजकीय चळवळ पुढे सुरू ठेवली प्रभाकर कोलंगडे यांनी त्यांच्या जीवनात असंख्य सर्वसामान्य आणि त्यांच्या सहकाऱ्यांना मार्गदर्शन करत धीर देण्याचे काम केले त्यांच्या या कार्याची दखल घेत आज गेले ४० वर्ष त्यांना ओळखत असणाऱ्या आणि त्यांच्याबरोबर काम करणाऱ्या सहकाऱ्यांनी, हितचिंतकांनी त्यांचा ६१ वा वाढदिवस थाटात साजरा करण्याचा मानस केला आहे.

माझं काय चुकलं! शेतकऱ्यांनो तुम्हीही..!

राजू शेट्टींची शेतकऱ्यांना भावनिक साद

कोल्हापूर : लोकसभा निवडणुकीत पराभवाचा सामना करावा लागलेल्या शेतकरी नेते राजू शेट्टी यांनी शेतकऱ्यांना साद घालत भावनीक पोस्ट केली आहे. कोल्हापुरातील हातकणंगले मतदारसंघात शिवसेना शिंदे गटाचे नेते धैर्यशील माने, महाविकास आघाडीचे सत्यजीत पाटील आणि स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे नेते राजू शेट्टी यांच्यात तिरंगी लढत झाली. ज्यात शेट्टी यांना क्रमांक तीनची मते मिळाली आहेत. त्यामुळे पराभवानंतर आता शेट्टींनी भावनिक पोस्ट करत शेतकऱ्यांना साद घातली आहे.

पराभवानंतर राजू शेट्टी यांनी एक पोस्ट शेअर केली आहे. यामध्ये त्यांनी माझे काय चुकले! प्रामाणिक असणे हा गुन्हा आहे का? असा सवाल करत त्यांनी शेतकऱ्यांनो तुम्हीही असे म्हणत पोस्ट शेअर केली आहे. ही पोस्ट सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. दरम्यान, हातकणंगले मतदारसंघातून राजू शेट्टी यांनी विजयाचा दावा केला होता. सर्वसामान्य

शेतकरी, गरीब, कष्टकरी वर्ग माझ्या पाठीशी असल्याचे राजू शेट्टी यांनी म्हटले होते. मात्र, या मतदारसंघातील जनतेने पुन्हा धैर्यशील माने यांना विजयाचा कौल दिला आहे. माने हे १३४२६ मतांनी विजयी झाले आहेत. हातकणंगले लोकसभा मतदारसंघात सुरुवातीपासूनच धैर्यशील माने आणि सत्यजीत पाटील यांच्यात जोरदार टक्कर पाहायला मिळाली. अत्यंत अटीतटीची ही लढत झाली. यामध्ये धैर्यशील माने हे फक्त १३४२६ मतांनी विजयी झाले आहेत. माने यांना एकूण ५२०१९० मते मिळाली तर सत्यजीत पाटील यांना एकूण ५०६७६४ मते मिळाली. तर राजू शेट्टींना एकूण १७९८५० मते मिळाली. या निवडणुकीत राजू शेट्टींचा तब्बल ३४०००० मतांनी पराभव झाला आहे.

हातकणंगले लोकसभा मतदारसंघातील लढत ही अत्यंत चुरशीची मानली जात होती. या मतदारसंघात तिरंगी लढत होती. यामध्ये धैर्यशील माने आणि सत्यजीत पाटील यांच्यात काँटे की टक्कर झाल्याचे पाहायला मिळाले. मात्र, शेतकऱ्यांचे प्रश्न घेऊन लढणारे राजू शेट्टी यांना क्रमांक तीनची मते मिळाली. त्यांना पराभवाचा धक्का सहन करावा लागला. यानंतर राजू शेट्टी यांनी ही भावनिक पोस्ट केली आहे.

आजची तरुण पिढी व्हाईटनर नशाच्या विळख्यात

आजच्या काळात तरुणांमध्ये व्यसन म्हणजे प्रतिष्ठेचे लक्षण

ज्योतीराम पाढंरपोटे

माजलगाव :- सध्या'व्हाईटनर'चे नशा/ व्यसन करणार्या तरुणांची संख्या वाढत आहे. यात मुख्यत्वेकरून अल्पवयीन मुले आणि महाविद्यालयीन तरुण यांचा समावेश अधिक आहे. ही नशा हातरुमालावर 'व्हाईटनर' लावून त्यातून येणार्या उग्र वासातून करण्याचे प्रमाण वाढले आहे. तरुणांच्या आरोग्यासाठी ही नशा घातक ठरत आहे.व्हाईटनरमध्ये 'डायक्लोरो इथिलीन' आणि 'बेंझिन' यांचे प्रमाण असल्याने त्यांचा उग्र वास येतो. व्हाईटनरची नशा ५ ते ८ घंटे राहू शकते. या नशेमुळे तरुणांचे मानसिक संतुलन बिघडणे,झोप न येणे,बेशुद्ध पडणे, हृदयविकाराचा झटका येणे आदी आजार उद्भवू शकतात. त्याही पुढे जाऊन 'नेलपेंट'च्या (नखांना लावायचा रासायनिक रंग) माध्यमातूनही नशा केली जात आहे.हे पदार्थ सध्या छुप्या पद्धतीने तरुणांना उपलब्ध होत आहेत.

पूर्वी केवळ मद्यपान, विडी,गांजा यांच्या पुरतेच मर्यादित असणारे युवक आता आधुनिक काळात ई-सिगारेट, व्हाईटनर,ब्राऊन शुगर,अफिम

अशा तत्सम नशायुक्त पदार्थांपर्यंत पोचले आहेत.आजच्या काळात तरुणांमध्ये व्यसन म्हणजे प्रतिष्ठेचे लक्षण बनले आहे.यातील धक्कादायक म्हणजे १५ वर्षांखालील शालेय विद्यार्थीही या पदार्थांचे सेवन करतांना आढळून येतात.अमली पदार्थ जर वेळेवर मिळाले नाही,तर ही मुले निराश होणे,कधी हिंसक,तर कधी आत्महत्येसारखे पराकोटीचे पाऊलही उचलतात. सध्याच्या स्पर्धेच्या काळात वाढत्या तणावाला सामोरे जाण्यासाठी प्रारंभी कुतूहलापोटी घेतलेले अमली पदार्थ पुढे जीवनाचा अविभाज्य भाग बनतात.यामध्ये तरुणांच्या खांद्याला खांदा लावून युवतीही मद्यपान करणे,सिगारेट पिणे यात आघाडीवर आहेत,हे अत्यंत लाजिरवाणे आणि गंभीर आहे.

चौकट

तरुणांनी व्यसनाधीन होण्यामध्ये त्यांच्या पुढे योग्य आदर्श नसणे,मानसिक दुबळेपणा आणि महत्त्वाचे म्हणजे जीवनात येणार्या तणावाच्या प्रसंगांना सामोरे कसे जायचे ? याचे कोणतेच शिक्षण अभ्यासक्रमात अंतर्भूत नसणे, हे आहे.

- केतन राठोड (पोलीस निरीक्षक, माजलगाव शहर पोलीस ठाणे)

चौकट

मुलांच्या पौढ आवस्थेत पालकांनी त्यांच्याशी संवाद वाढवणे आणि त्यांच्यावर लक्ष ठेवणे अत्यंत आवश्यक आहे. तरुण पिढी देशाचे पुढचे भवितव्य आहे.हीच पिढी व्यसनाधीन झाली, तर देशाचे भविष्य कसे असेल ? त्यामुळे शासन, प्रशासन आणि पालक यांनी अधिक दायित्व घेऊन तरुण पिढी व्यसनापासून कशी दूर राहील,हे पहाणे आवश्यक आहे !

तुलसी महाविद्यालयात जागतिक पर्यावरण दिन उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

०५ मे - येथील तुलसी संगणकशास्त्र व माहिती तंत्रज्ञान महाविद्यालयात वृक्षारोपण कार्यक्रम आयोजित करून जागतिक पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.राष्ट्रीय सेवा योजना व ग्रीन क्लबच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ एल.एम.थोरात,आयक्यूएसी समन्वयक डॉ.योगिता लांडगे यांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी अनेक प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी सहभागी झाले होते. यावेळी विद्यार्थ्यांनी ''आमची जमीन'' या घोषवाक्याखाली पर्यावरण रक्षणाचे विविध पोस्टर तयार करत पर्यावरण संवर्धनाची तसेच पाण्याचा जपून वापर करण्याची पोस्टरद्वारे जनजागृती केली. वृक्षारोपण कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ग्रीन क्लब समन्वयक प्रा.किशोर वाघमारे, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.सुरेश कसबे यांचे सहकार्य लाभले या कार्यक्रमात विध्यार्थ्यांनी मोठ्याप्रमाणात सहभाग नोंदविला.

पराभवाची जबाबदारी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्विकारली

राज्यात भाजपला मोठा झटका; उपमुख्यमंत्रीपदाचा दिला राजीनामा

मुंबई । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीचा निकालानंतर गायब असलेले देवेंद्र फडणवीस आज अचानक प्रकटले यावेळी त्यांनी धक्कादायक निर्णय घेत राज्याच्या उपमुख्यमंत्री पदाचा राजीनामा दिला आहे. काल महाराष्ट्रात आलेल्या निकालाने भाजपच्या पायाखालची जमीन सरकली. पराभव कसा झाला याचे मंथन आज भारतीय जनता पक्षाच्या बैठकीत केले. त्यानंतर भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधला. त्यांनी भाजपचा पराभव का झाला? त्याचे कारणे माध्यमांना सांगितली. मराठा आरक्षण, शेतीमालास भाव हे प्रश्न कळीचे मुद्दे ठरले. तसेच संविधान बदलणार असल्याचा जो प्रचार केला गेला, त्याचा फटका भाजपला बसला असल्याचे देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

आता लोकसभा निवडणुकीच्या पराभवाची जबाबदारी स्वीकारत राज्य मंत्रिमंडळातून बाहेर पडण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली आहे. तसेच पराभवाची जबाबदारी स्वीकारत राज्य मंत्रिमंडळातून बाहेर पडण्याची इच्छा व्यक्त केली आहे. नेता म्हणून महाराष्ट्रातील भाजपच्या पराभवाची सर्व जबाबदारी माझी आहे. पण मी हरणारा नाही, पण ताकदीने मैदानात उतरणार आहे. परंतु नेतृत्वाला माझी विनंती आहे, मला उपमुख्यमंत्रीपदाच्या जबाबदारीतून मुक्त करावे आणि पक्षात काम करण्याची जबाबदारी द्यावी, असे धक्कादायक विधान देवेंद्र फडणवीस यांनी माध्यमांशी बोलताना केले.

पराभव ही सामूहिक जबाबदारी–मुख्यमंत्री

निवडणूकीतील पराभव ही सामूहिक जबाबदारी असून तिन्ही पक्षाने निवडणूकीत एकत्रित काम केले, मतांची टक्केवारी पाहिली तर मुंबईत महायुतीला दोन लाखाहून अधिक मते मिळाली. मोदींकडे विकासाचा अजेंडा आहे. गेल्या दोन वर्षात राज्यात अनेक चांगले निर्णय सरकारने घेतले, या निवडणूकीत जागा कमी झाल्या असल्या तरी मते वाढली आहेत. देवेंद्र फडणवीस यांच्याशी मी बोलणार असून अपयशाने खचून न जाता आम्ही पुन्हा नव्याने काम सुरू करू, विरोधकांनी जनतेची दिशाभूल करून मते मिळविण्याचा प्रयत्न केला मात्र हे तात्पुरते यश आहे, आम्ही विकासाचा अजेंडा घेवून पुढे जाणारे आहोत, विरोधकांच्या अपप्रचारामुळे जनतेचा संभ्रम दूर करण्यात आम्ही कमी पडलो अशी प्रतिक्रिया मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

बीड निवडणुकीत अजिंक्य चांदणे गेम चेंजरच्या भुमिकेत

बीड / प्रतिनिधी

डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडिया पक्षाचे राज्य अध्यक्ष अजिंक्य चांदणे बीड लोकसभा मतदार संघात बजरंग सोनवणे यांच्या विजयाच्या वाट्यात पॉलिसी मेकर ठरले आहेत.महाविकास आघाडी सोबत राज्यातील सभा गाजवत असताना चांदणे यांनी आपले होम पीच असणाऱ्या बीड लोकसभेवर मात्र वैयक्तिक लक्ष घालून ते स्वतः राहत असलेल्या पेठ बीड या भागाची ही पॉलिसी आखून बजरंग सोनवणे यांच्या मताच्या वाट्यात भर टाकण्यात यशस्वी झाले. बीड स्थानिकला असणारे प्रस्थापित धनदांडगे, जात दांडगे नगरसेवक हे सगळे सोनवणे यांच्या विरोधात असताना योग्य प्लॅनिंग व पॉलिसी रचून अत्यंत संयमाने हा विजय खेचून आणण्यात अजिंक्य चांदणे यांची पॉलिसी अत्यंत महत्त्वाची ठरली आहे.

बीड लोकसभेचे वातावरण सुरुवातीपासूनच तापलेले होते. राष्ट्रवादी शरद पवार गटाचे बीड लोकसभा उमेदवार बजरंग सोनवणे यांचा विजय निश्चित होण्यासाठी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे राज्य अध्यक्ष अजिंक्य चांदणे यांनी डोर टू डोर तगडी प्रचार यंत्रणा राबविली होती. एवढेच नव्हे तर विजयासाठी डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियने विजय मिळावा देखील घेतला होता. बजरंग सोनवणे यांना उमेदवारी घोषित झाल्यापासून अजिंक्य चांदणे कार्यकर्त्यांच्या गाठीभेटी घेत होते. निवडणूक संदर्भात त्यांनी शरद पवार यांच्याशी वारंवार चर्चा आणि भेटी घेऊन विजयाचे रणसिंग फुंकले होते. कुणाच्याही दबावाला आणि षडयंत्राला भीक न घालता तगडी प्रचार यंत्रणा राबवून बजरंग सोनवणे यांचा विजय खेचून आणण्यासाठी अजिंक्य चांदणे पॉलिसी मेकर ठरले आहेत, असेच म्हणावे लागेल.

आपला परिसर सुंदर व शांतीप्रिय करण्यासाठी वृक्ष लागवड व संगोपन करा – न्यायाधीश कदम

किल्लेधारुर । प्रतिनिधी

भारतीय सेनेची बी कंपनी १३६ इको बटालियन ही तुकडी बीड जिल्ह्यात वृक्षआच्छादन व वनआच्छादन वाढविण्यासाठी कार्यरत आहे. आज पर्यावरण दिनाचे औचित्य साधून १० हजार वृक्ष लागवडीचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी दिवाणी न्यायाधीश श्रीमती एन.एस. कदम यांनी विद्यार्थ्यांना संबोधित करताना आपला परिसर सुंदर व शांतीप्रिय करण्यासाठी वृक्ष लागवड व संगोपन करा असे आवाहन केले तर सैनिकांच्या कार्यास सलाम करत कौतूक केले.

२०२४-२५ ह्या वर्षी इको बटालियन मार्फत धारुर तालुक्यात किल्ले धारुर व घागरवडा येथे २२५००० वृक्षारोपण करण्यात येणार आहे. जागतिक पर्यावरण दिनाचे निमित्त साधून बीड जिल्ह्यातील धारूर तालुक्यात भारतीय सेनेच्या इको बटालियनने किल्ले धारूर व घागरवडा येथे १०००० वृक्षारोपण करून रोपवनास प्रारंभ केला. रोपवनाचे उद्घाटन धारुर दिवाणी न्यायालयाच्या न्यायाधीश श्रीमती एन. एस. कदम व मानवलोक सेवाभावी संस्थचे संचालक श्री अनिकेत लोहिया ह्यांच्या हस्ते करण्यात आले. न्यायाधीश कदम यांनी सैन्य बटालियनचे कौतूक केले. आपला परिसर आनंदमयी व शांतीपुर्ण ठेवण्यासाठी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. याप्रसंगी लोहिया यांनी परदेशात आलेल्या अनुभवातून आपल्या भागातही परिसर नंदनवन करण्याचा प्रयत्न असल्याचे मत व्यक्त केले. यावेळी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय किल्ले धारूरचे वन परिक्षेत्र अधिकारी, वनरक्षक,वनपाल एनसीसीचे कॅडेट्स व एनएसएसचे विद्यार्थी, ज्ञानदीप प्राथमिक विद्यालय धारुरचे विद्यार्थी व शिक्षक वृंद, माजी सैनिक, स्थानिक पोलिस अधिकारी ,प्रतिष्ठित नागरिक व मीडियाचे प्रतिनिधी हजर होते.

धारूर तालुक्यात भारतीय सेनेकडून रोपवनास प्रारंभ

अरविंद केजरीवालांचा पाय खोलात

नवी दिल्ली । वृत्तसेवा

राउस एवेन्यू कोर्टाने बुधवारी दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांची मेडिकल आधारावर देण्यात येणारी जामीन याचिका फेटाळली. दिल्ली अबकारी धोरण प्रकरणी कोर्टाने त्यांची न्यायालयीन कोठडी १९ जूनपर्यंत वाढवली आहे. केजरीवाल यांना व्हर्चुअली कोर्टमध्ये हजर करण्यात आले. या प्रकरणात डिफॉल्ट जामीन मिळण्यासाठी केलेल्या अरविंद केजरीवाल यांच्या अर्जावर दिल्ली कोर्ट ७ जून रोजी सुनावणी करणार आहे.

केजरीवाल यांची जामीनची मागणी

केजरीवाल यांनी अंतरिम जामीनसाठी याचिका दाखर केली होती. त्यांच्या प्रकृती

अस्वास्थ्यामुळे अनेक चाचण्या करण्यासाठी सात दिवसांचा वेळ मागितला होता. त्यांनी जामीनसाठी याचिकादेखील दाखल केली होती. १ जून रोजी सुनावणीवेळी सॉलिसिटर जनरल तुषार मेहता आणि अतिरिक्त सॉलिसिटर जनरल एस व्ही राजू यांनी याचिकेच्या ग्राह्यतेबाबत आणि उद्देशाबाबत अनेक आक्षेप घेतले होते.

अंधाऱ्या रात्री परळीत अनेक वाहनांची तोडफोड

परळी । प्रतिनिधी

बीड लोकसभा मतदार संघाचा निकाल लागल्यानंतर परळीतील जुन्या गावभागात मध्यरात्री फटाक्यांची अतिषबाजी सुरु होती.याच दरम्यान विज गुल असल्याने काही समाजकंटकांनी अंधाराचा गैरफायदा घेत रस्त्यावरील वाहनांवर दगडफेक करत वाहनांचे नुकसान केले.या घटनेत १२ वाहनांचे नुकसान झाले असुन याप्रकरणी सतिश सानप यांनी याबाबय परळी शहर पोलिस ठाण्यात अज्ञात तक्रार दिली असुन बुधवारी (दि.५ मे) रात्रीपर्यंत गुन्हा दाखल झालेला नव्हता.

मंगळवार दि.४ जुन रोजी बीड लोकसभा मतदार संघाची मतमोजणी झाली.या निवडणुकीत परळीच्या पंकजा मुंडे या

महायुतीकडुन निवडणुक रिंगणात असल्याने परळी शहरात निकालाबाबत सकाळपासुनच उत्सुकता होती.दुपारनंतर शहरात तणावपूर्ण शांतता होती.रात्री १० च्या सुमारास निवडणुकीचा निकाल आल्यानंतर परळी शहरातील काही भागात फटाक्यांची अतिषबाजी करण्यात आली.ही अतिषबाजी मध्यरात्री १२ वाजेपर्यंत सुरुच होती.याच दरम्यान रात्री ९ ते १२ या वेळेत गणेशपार भागातील विजपुरवठा खंडीत होता.सर्वत्र अंधार असल्याने राणी लक्ष्मीबाई टॉवर ते गणेशपार व संत सावतामाळी मंदिर जवळ उभ्या असलेल्या वाहनांवर अज्ञात समाजकंटकांनी दगडफेक केली.यात सतिश सानप यांच्या वाहनाबरोबर इतर १२ ते १३ वाहनांचे नुकसान झालेले आहे.ही दगडफेक करणारे कोण,या घटनेत किती वाहनांचे किती रुपयांचे नुकसान झाले याचा तपास करुन गुन्हा दाखल होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

विजयानंतर बजरंग सोनवणे मनोज जरांगेंच्या भेटीला

बीड । प्रतिनिधी

लोकसभा निवडणुकीत राज्यातील सर्वात रोमहर्षक लढत ठरलेल्या बीड मतदारसंघात शरद पवार गटाच्या बजरंग सोनावणे यांनी भाजपच्या पंकजा मुंडे यांचा तब्बल ७ हजारांनी पराभव केला. बीड लोकसभेचा निकाल अनेक अर्थांनी महत्त्वाचा मानला जात आहे. राज्यातील महाविकास आघाडीच्या बाजूने असलेले वातावरण आणि मराठा फॅक्टरने बीड लोकसभेतील प्रस्थापित राजकीय समीकरणांचा पार चोळामोळा केल्याचे दिसून आले.

बीड लोकसभेत पंकजा मुंडे यांना नमवण्याचा पराक्रम करणाऱ्या बजरंग सोनावणे यांना राज्यात महाविकास आघाडीच्या बाजूने जे वातावरण होते, त्याचा बराच फायदा झाला. बीडमध्ये मराठा आरक्षणामुळे जातीय संघर्ष पाहायला मिळाला. हे दोन्ही फॅक्टर्स निर्णायक ठरले असले तरी महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांनी ग्राऊंडवर झोकून देऊन काम केले. शरद पवार गट आणि मविआचे कार्यकर्ते, पदाधिकारी लोकांपर्यंत पोहोचले. या सगळ्यांनी एकत्र येत राज्यात महायुतीविरोधात निर्माण झालेला असंतोष इन्कॅश करण्याचा प्रयत्न ठरला, हा प्रयत्न पूर्णपणे यशस्वी ठरला. या सगळ्यामुळे बजरंग सोनावणे हे निवडून आले.

गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपन्न

परळी । प्रतिनिधी

परळी येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी, श्री शनी मंदिर देवस्थान ट्रस्ट, शनैश्वर प्रतिष्ठान, तेली युवक संघटना, शनैश्वर महिला मंडळ, महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेच्या वतीने १० व १२ वीच्या गुणवंत विद्यार्थी गौरव समारंभाचे आयोजन बुधवारी (ता.०५) करण्यात आले होते. या कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमास अध्यक्ष राधाकिशन साखरे, प्रमुख पाहुणे श्री शनी मंदिर देवस्थान ट्रस्टचे विश्वस्त राजाभाऊ शिंदे, रघूनाथ भाग्यवंत, नागनाथ सोनटक्के, शिवाजी पिंपळे, नागनाथ भाग्यवंत आदि उपस्थित होते. श्री शनी मंदिर सभागृहात आयोजित कार्यक्रमाच्या सुरुवातीला संत संताजी जगनाडे महाराज यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते

पुष्पहार अर्पण करून करण्यात आले. मान्यवरांचा शाल,श्रीफळ, स्मृतीचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. प्रास्ताविक उत्तम साखरे यांनी मांडले. यावेळी नागनाथ सोनटक्के यांनी दहावी व बारावी (विज्ञान) मध्ये समाजातून प्रथम व द्वितीय आलेल्या विद्यार्थ्यांना १५०० ,१००० रुपये नगदी रोख बक्षीस वितरण करण्यात आले. व १० व १२ वीतील गुणवंत विद्यार्थ्यांना स्मृती चिन्हे, प्रमाणपत्र देवून सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रविण फुटके यांनी केले तर आभार प्रा.मधूकर शिंदे यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री शनी मंदिर देवस्थान ट्रस्ट, शनैश्वर प्रतिष्ठान, तेली युवक संघटना,शनैश्वर महिला मंडळ व महाराष्ट्र प्रांतिक तैलिक महासभेचे पदाधिकारी यांनी मेहनत घेतली. कार्यक्रयास समाजातील महिला, नागरिक, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

ज्यादा दराने कापूस बियाण्याची विक्री

शिरसदेवीच्या सार्थक ॲग्रो एजन्सीवर कारवाई

बीड । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील शिरसदेवी येथील सार्थक अग्रो एजन्सी चे मालक रमेश प्रभाकर डरपे यांनी ग्राहकाकडून ८६४ रुपयांच्या बॅगचे तेराशे रुपये घेतले मात्र पावती देताना ८६४ दिली याप्रकरणी कृषी अधिकारी अभय वडकुते यांनी खात्री करून तलवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून रमेश डरपे यांच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. गेवराई तालुक्यातील सिरसदेवी येथील सार्थक अग्रो एजन्सी चे मालक रमेश प्रभाकर डरपे हे कबड्डी कापूस बियाणे ८६४ ची बॅग तेराशे रुपयाला विक्री करत असल्याची माहिती शेतकऱ्यांनी कृषी विभागाचे अभय किसनराव वडकुते यांना दिल्यावर वडकुते यांनी श्रीकांत पवार व मुकुंद पवार या दोघांना नोटांचे नंबर नोट करून या दुकानात पाठवले. दुकानाचे मालक रमेश डरपे यांनी कबड्डी कापूस बियाण्याची ८६४रुपयाची बॅग तेराशे रुपयांना दिली. मात्र बिल देताना ८६४रुपयाचे दिले .याची खात्री करून कृषी विभागाचे अभय वडकुते यांनी रमेश डरपे हे जादा दराने बियाणे विक्री करत असल्याचे स्पष्ट झाल्यानंतर या प्रकरणी तलवाडा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करून तलवाडा पोलिसात भादवी १८६० चे कलम ४२० नुसार रमेश डरपे यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

खरीप हंगाम आला की, बियाणांच्या दुकानावर शेतकरी गर्दी करतात. बीड जिल्ह्यामध्ये कापसाचे क्षेत्रही जास्त असल्याने कापसाच्या बियाणासाठी दुकानावर झुंबड उडते, यात एखाद्या बियाणाला मागणी वाढली की, व्यापारी त्याचा फायदा घेवून किमती वाढवतात. शेतकऱ्यांकडून अवाच्या सव्वा पैसे वसूल करण्याचा हा फंडा गेल्या अनेक दिवसांपासून चालू असून आता कृषि विभागाने ही बाब गांभीर्याने घेतल्याने कृषी दुकानदारांवर गुन्हे दाखल होताना दिसत आहेत.



This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

अजित पवारांच्या परतीचा निर्णय शरद पवारांकडे: श्रीनिवास पवार

घर चालवल्यासारखा पक्ष शरद पवार यांनी चालवला

बारामती: : कुटुंबापासून फारकत घेतलेल्या उपमुख्यमंत्री अजित पवार यांना परत यायचे असेल, तर त्याचा सर्वस्वी निर्णय राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार हे घेतील. शरद पवार यांचे मन मोठे आहे, पण अजित पवार त्यांच्याकडे जातील का?, हाही प्रश्न आहे. दोघांच्याही डोक्यात काय चाललेलय हे कळू शकत नाही, असे मत उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे बंधू श्रीनिवास पवार यांनी व्यक्त केले. बारामतीत विधानसभेला युगेंद्र पवार उभे राहतील का?, याचा निर्णय शरद पवार, जयंत पाटील व सुप्रिया सुळे घेतील, असेही त्यांनी सांगितले.

बारामतीत पत्रकारांशी बोलताना त्यांनी अजित पवार यांना कानपिचक्या दिल्या. शिवाय ममत्वही दाखवले. प्रचार काळात अजित पवार यांनी कुटुंबियांवर केलेल्या टीकेवर श्रीनिवास पवार म्हणाले, अजित पवार आमच्या सगळ्यांमध्ये वयाने मोठे आहेत. मोठा भाऊ हा वडीलांसमान असतो. तो धाकट्या भावाला, बहिणीला काही बोलला ते धरून ठेवायचे नसते.

सुप्रिया सुळे यांच्या विजयाबद्दल ते म्हणाले, गेली १७ वर्षे त्या खासदार आहेत. बारामतीत त्या फार लक्ष घालत नव्हत्या. कारण येथे अजित पवार सगळे बघत होते. परंतु इतर तालुक्यात सुप्रिया यांचा संपर्क चांगला होता. मतदार त्यांना अंतर देणार नाहीत, हे आम्हाला पक्के ठावूक होते. एकाच घरात दोन पक्ष झाल्याने नात्यात निवडणूक झाली. निवडणुकीपुरते नाते बाजूला ठेवूनच आम्हाला ही निवडणूक लढावी लागली. प्रचार काळात शरद पवार, सुळे यांनी कोणाचाही उल्लेख केला नाही, ते फक्त कामांवर आणि प्रश्नांवर बोलत राहिले. अजित पवार भावनिकतेवर बोलले, पण आम्ही तसे बोललो नाही. मतदार सूज्ञ असतो. ते बघत असतात, ऐकत असतात. या पदासाठी कोण योग्य याचा निर्णय जनतेने घेतला. नेतेमंडळी तिकडे होती, परंतु सामान्य जनता आमच्यासोबत होती. त्यांना आमदारकीला मत दिले म्हणजे जनता दावणीला बांधली असे होत नाही. जनतेचे स्वतंत्र मत असते. राजकारण हे 'बॅलन्स शिट' नाही असेही श्रीनिवास पवार यांनी सांगितले.

भाजपसोबत अजित पवार गेल्याचे जनतेला आवडले नाही का?, या प्रश्नावर ते म्हणाले. अजित पवार गेली अनेक वर्षे राजकारणात आहेत. त्यांचेही काही आडाखे असतील, त्यानुसार त्यांनी निर्णय घेतला असेल. भाजपने अजित पवार यांचा घात केला का?, या प्रश्नावर ते म्हणाले, पराभव झाला म्हणून दुसऱ्याला दोष देणे चुकीचे आहे. प्रत्येकाने आत्मपरीक्षण केले पाहिजे. विजयासाठी अनेकजण पुढे येतात, तशी पराजयाचीही जबाबदारी घेतली पाहिजे.

अजित पवारांविरोधात काम केल्याने मीडियाचा फोकस युगेंद्रकडे गेला आहे. त्यामुळे विधानसभेसाठी त्यांचे नाव चर्चेत आहे. इथे तिकिट कोणाला द्यायचे याचा निर्णय शरद पवार, जयंत पाटील, सुप्रिया सुळे घेतील. आम्ही त्यांचे काम करू, असे श्रीनिवास पवार म्हणाले.

प्रशिक्षण संस्थांनी प्रस्ताव सादर करण्याचे अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाचे आवाहन

पुणे, साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयामार्फत प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण देण्यासाठी प्रशिक्षण संस्थेची निवड केली जाणार असून पात्र संस्थानी ३० जूनपर्यंत प्रस्ताव सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

महामंडळाच्या पुणे जिल्हा कार्यालयास २०२४-२५ या आर्थिक वर्षाकरीता ६०० प्रशिक्षणार्थींचे उद्दिष्ट प्राप्त झाले आहे. त्याअंतर्गत लाभार्थी, प्रशिक्षण संस्था यांच्या पात्रता व अटी-शर्ती पुढीलप्रमाणे आहेत. या योजनेअंतर्गत अर्जदार हा मातंग समाज व तत्सम १२ पोट जातीतील असावा. अर्जदार महाराष्ट्राचा तसेच पुणे जिल्ह्यातील रहिवाशी असावा. वय १८ ते ५० वर्ष असावे. त्याने शासनाच्या, महामंडळाच्या कोणत्याही प्रशिक्षण योजनेचा लाभ घेतलेला नसावा. अर्जदाराचे वार्षिक उत्पन्न ३ लाख रूपयांपेक्षा जास्त नसावे. एका कुटुंबातील एकाच व्यक्तीला या योजनेचा लाभ घेता येईल.

अर्जदाराने आधारसलग्न बँक खात्याचा तपशील सादर करणे आवश्यक आहे. प्रशिक्षणार्थींने निवडलेल्या प्रशिक्षणाची फी कौशल्य विकास व उद्योजकता विभागाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे करण्यात येईल. प्रशिक्षणार्थीने कौशल्य विकासचे अभ्यासक्रम निवडणे बंधनकारक राहील. संस्थेने कौशल्य विकास विभागाच्या संकेतस्थळावर नोंदणी केलेली असावी. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधी पूर्ण केल्यानंतर शासनाच्या नियमानुसार परीक्षेस बसविण्याची जबाबदारी संस्थाचालकांची राहील त्याशिवाय संस्थेची फी अदा केली जाणार नाही. संस्थेची फी ठरवलेल्या नियमानुसार दिली जाईल. संस्था पुणे जिल्हा कार्यक्षेत्रातील असावी व इतर महामंडळाने लावलेले निर्बंध संस्थेस बंधनकारक राहतील. जिल्हा स्तरावर एका अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यासाठी एकाच संस्थेची निवड करण्यात येईल. प्रशिक्षणार्थींची बायोमेट्रिक पद्धतीने व हजेरी पटावर स्वाक्षरीने हजेरी घेणे बंधनकारक राहील. विद्यार्थी निहाय प्रमाणीत केलेली हजेरी पाठविल्याशिवाय संबंधित प्रशिक्षण संस्थेची फी अदा केली जाणार नाही. संस्थेची निवड प्रादेशिक व्यवस्थापक यांच्या अध्यक्षतेखालील समितीच्या शिफारशीनंतर अंतीम मंजुरी मुख्यालय स्तरावरून देण्यात येईल.

पात्र लाभार्थी, प्रशिक्षण संस्थांनी साहित्य रत्न लोकशाहीर अण्णा भाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, स. नं. १०३,१०४ मेंटल कॉर्नर, विश्रांतवाडी पोलीस स्टेशन समोर, येरवडा पुणे- ०६, येथे परिपूर्ण प्रस्ताव सादर करावेत तसेच अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२०-२९७०३०५७ वर संपर्क साधावा, असे आवाहनही महामंडळाचे जिल्हा व्यवस्थापक शि. लि. मांजरे यांनी केले आहे.

एकपात्री कलाकारांनी एकपात्री-बहुरूपी कला प्रकाराकडे वळावे-श्रीनिवास भणगे

एकपात्री कला प्रसार दिन सोहळ्याचा समारोप

पुणे । प्रतिनिधी

एकपात्री सादरीकरण म्हणजे कणा असणारे नाट्य होय. यात नटाचा कस लागतो. एकपात्री सादरीकरणामध्ये विचार असावा लागतो. एकपात्री सादरीकरणातून रसिकांना गुंगवून ठेवणे अपेक्षित असते. एकपात्री कलाकाराने एकपात्री-बहुरूपी या प्रकाराकडे वळून स्वत:ची प्रतिभा सिद्ध करावी, अशी अपेक्षा प्रसिद्ध नाटककार, लेखक-दिग्दर्शक श्रीनिवास भणगे यांनी व्यक्त केली.

एकपात्री कलाकार परिषद, महाराष्ट्र आणि निळू फुले कला अकादमी यांच्या संयुक्त विद्यमाने ज्येष्ठ एकपात्री कलाकार कै. मधुकर टिल्लू स्मृती आयोजित एकपात्री कला प्रसार दिन सोहळ्याचा समारोप आज (दि. ५) भणगे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. त्या वेळी ते बोलत होते. १ ते ५ जून या कालावधीत निळू फुले कला अकादमी येथे या सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. या कालावधीत ३५ कलाकारांनी एकपात्री, अभिवाचन, कथाकथन, विनोदी किस्से सादर करून रसिकांना आनंद दिला. निळू फुले कला अकादमीचे अध्यक्ष सुरेश देशमुख, एकपात्री कलाकार परिषद, महाराष्ट्रचे अध्यक्ष दीपक रेगे, एकपात्री कलाकार मकरंद टिल्लू समारोप सोहळ्यास उपस्थित होते.अनाकलनीय नातेसंबंध घटनांवर भाष्य करणारी गोष्ट एकपात्री सादरीकरणातून मांडली जाते, असे सांगून भणगे म्हणाले, एकपात्री हा शब्द वन मॅन शोवरून रुपांतरीत केला गेला आहे. पुढे याचे अनेक प्रकार पडत गेले. स्टँडअप टॉक शो हा देखील एकपात्री

सादरीकरणाचाच प्रकार आहे. एकपात्रीच्या सादरीकरणातून विचारांना चालना मिळते. विविध पात्रांच्या भूमिका एकावेळी साकारताना कलाकाराचा कस लागतो. 'स्किट' या प्रकाराला कणा नसल्यामुळे एकपात्रीसाठी त्याची उपयुक्तता नाही. एकपात्रीमध्ये एखादा विचार सातत्याने पुढे नेत मनोरंजन किवा गंभीर बाब रसिकांसमोर मांडत गेल्यास ते उत्तम प्रकारचे सादरीकरण ठरते. या वेळी बोलताना भणगे यांनी मधुकर टिल्लू यांच्या आठवणींना उजाळा दिला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन, मान्यवरांचा परिचय एकपात्री कलाकार परिषद, महाराष्ट्रच्या उपाध्यक्ष मंजुषा जोशी यांनी करून दिला. संदिप बेलवलकर, राहुल भालेराव, भाग्यश्री देशपांडे, संजय गोसावी यांचे सादरीकरण झाले. कलाकारांचा सत्कार श्रीनिवास भणगे यांच्या हस्ते करण्यात आला. निवेदन स्मिता कुलकर्णी यांनी केले.

दरोड्याच्या तयारीत असलेली टोळी पोलिसांच्या जाळ्यात, ८ जणांविरोधात गुन्हा दाखल

पुणे । प्रतिनिधी

दरोड्याच्या तयारीत असलेल्या तिघांना पर्वती पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहे. यात एका विधी संगर्षग्रस्त बालकाचाही समावेश आहे. या टोळीतील उर्वरित पाच जण पळून गेले आहे. या प्रकरणी पोलिसांनी एकूण ८ जणांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई सोमवारी (दि.३) रात्री साडे नऊ वाजण्याच्या सुमारास जनता वसाहतकडे जाणाऱ्या ब्रिजजवळ करण्यात आली. बसवराज उर्फ अभिषेक उर्फ माया राजेंद्र पाटील (वय-१९ रा. गल्ली नं. १५, जनता वसाहत, पुणे), अमित शंकर कांदे (वय-२७ रा. गल्ली नं. १८, जनता वसाहत, पुणे) यांना अटक करुन एका १७ वर्षाच्या अल्पवयीन मुलाला ताब्यात घेतले आहे. ओंकार उर्फ दाद्या वामन आल्हाट (रा. दांडेकर पुल, पुणे मुळ रा. म्हाडा वसाहत, वैदुवाडी, हडपसर), प्रमोद अंकुश कळंबे (रा. पर्वती दर्शन), अमन झारेकरी (रा. दांडेकर पुल, पुणे), पृथ्वीराज कांबळे (रा. गल्ली नं.३ संतोषनगर, कात्रज) यांच्यावर भा.दं.वि. कलम ३९९, ४०२, आर्म ॲक्ट, महाराष्ट्र पोलीस कायद्यांतर्गत गुन्हा दाखल केला आहे. याबाबत पार्वती पोलीस स्टेशन मधील पोलीस शिपाई अमोल बबन दबडे यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पर्वती पोलीस ठाण्यातील तपास पथकाला माहिती मिळाली की, कॅनॉल रोडवरील जनता वसाहतकडे जाणाऱ्या सार्वजनिक रोडवर काही तरुण हातात कोयते घेऊन दरोडा टाकण्याच्या तयारीत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी सापळा रचला. पोलीस आल्याची चाहूल लागताच अंधाराचा फायदा घेऊन पाचजण कोयत्यासह पळून गेले. तर तीन जणांना ताब्यात घेण्यात आले. त्यांच्याकडून धारदार कोयते जप्त करण्यात आले आहेत. ताब्यात घेतलेल्या आरोपींकडे सखोल चौकशी केली असता दांडेकर पुल येथील पेट्रोल पंपावर दरोडा टाकणार असल्याचे सांगितले. पुढील तपास पार्वती पोलीस करीत आहेत.

अग्रसेन ट्रस्टच्या वतीने नेत्र तपासणी शिबीर

पुणे । प्रतिनिधी

श्री अग्रसेन ट्रस्ट चिंचवड - प्राधिकरण आणि जानकी वुमेन्स वेलफेयर ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने चिंचवड येथील श्री अग्रसेन भवन मध्ये नेत्ररोग तथा मोतीबिंदू तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबीरा मध्ये अंदाजे १०० जणांची तपासणी केली. त्यामध्ये ४० रुग्णास मोतीबिंदूची शस्त्रक्रिया करण्याची आवश्यकता असल्याचे निष्पन्न झाले.या ४० रुग्णांवर करण्यात येणार असलेल्या शस्त्रक्रिया क्रिसला डेव्हलपर्स आणि आयुर्वेद रुग्णालय यांच्या माध्यमातून केली जाणार आहे.

कार्यक्रमास प्रमुख अतिथि माजी उपमहापौर शैलजाताई मोरे, श्री अग्रसेन ट्रस्टचे अध्यक्ष सुनीलअग्रवाल, मेडिकल कमिटी अध्यक्ष विनोद बंसल, जानकी देवी ट्रस्टचे ओमप्रकाश अग्रवाल, सागर अग्रवाल , आयुर्वेद रुग्णालयाचे डॉ.चंदना विरकर, डॉ. संदीप दारुंडे, डॉ. मनिषा पिंगळे, डॉ. सुखदा कुलकर्णी , अनुप मोरे, ईश्वर अग्रवाल, डॉ. रामप्रसाद गुप्ता आदी मान्यवर उपस्थित होते. या शिबिराच्या आयोजनासाठी डॉ. रमेश बंसल, डॉ. संतोष अग्रवाल आणि श्री अग्रसेन ट्रस्ट हॉस्पिटलच्या डॉक्टर टीमचे विशेष सहकार्य लाभले.

पराभवानंतर बारामतीत राष्ट्रवादी भवनात शुकशुकाट

बारामती । प्रतिनिधी

पक्ष आणि चिन्ह मिळाल्यानंतर जल्लोष करणाऱ्या आणि शहरातील दोन्ही कार्यालये आपल्या ताब्यात ठेवण्यात यश मिळविलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) भवनामध्ये मंगळवारी (दि. ४) निकाल जाहीर होऊ लागताच शुकशुकाट पसरला. लाखोंच्या फरकाने उमेदवार निवडून येणार अशी घोषणाबाजी करणारे राष्ट्रवादीचे प्रमुख पदाधिकारी नॉट रिचेबल झाले.

बारामतीच्या यंदाच्या निवडणुकीकडे देशाचे लक्ष होते. येथे ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यावर मात केली. कागदावर अजित पवार यांच्याकडे बलाढ्य ताकद असल्याचे दिसत होते.

प्रत्यक्षात मतात ती ताकद परावर्तीत झाली नाही. हे अजित पवार यांचे अपयश नसून त्यांच्यानंतर दुसर्या फळीत काम करणार्या बेजबाबदार

पदाधिकार्यांचे असल्याचे आता बारामतीकर जाहीर बोलू लागले आहेत. निवडणूक प्रचार काळात देशासह जगभरातील माध्यमांचे बारामतीकडे लक्ष लागले होते. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय माध्यम प्रतिनिधी बारामतीत दाखल झाले होते. त्यामुळे अजित पवार गटांकडे असणारी दोन्ही राष्ट्रवादी भवन कायम गर्दीने फुल्ल होती. पदाधिकार्यांच्या बाईटसाठी चढाओढी दिसून यायच्या. हे पदाधिकारी मंगळवारी बारामतीत दिसले नाहीत.

पक्ष फुटीनंतर शरद पवार गटाकडे स्वत:चे कार्यालयच उरले नव्हते. दोन्ही भव्य-दिव्य कार्यालये अजित पवार गटाकडे गेली. त्यामुळे काम कोठून सुरू करायचे हा प्रश्न त्यांना पडला होता. पक्षाचे शहराध्यक्ष ॲड. संदीप गुजर यांच्या मालकीच्या एका जुन्या इमारतीलाच पक्ष कार्यालयाचे स्वरूप देण्यात आले. तालुकाध्यक्ष ॲड. एस. एन. जगताप, शहराध्यक्ष ॲड. संदीप गुजर, युवकाध्यक्ष सत्यव्रत काळे यांनी येथून हळूहळू कामाला सुरुवात केली. सुरुवातीला या कार्यालयात यायला देखील लोक घाबरायचे.पुढे हळूहळू कार्यकर्ते गोळा होऊ लागले. या छोट्याशा कार्यालयाने अहोरात्र सुप्रिया सुळे यांच्यासाठी परिश्रम घेतले. हे परिश्रम त्यांना विजयापर्यंत घेऊन गेले. दुसरीकडे पॉश कार्यालये असतानाही अजित पवार गटाचे पदाधिकारी-कार्यकर्ते आपल्या उमेदवाराला विजयापर्यंत घेऊन जाऊ शकले नाहीत. त्यामुळे मंगळवारी निकाल जाहीर होताना एका छोट्या कार्यालयाबाहेर मोठा जल्लोष तर राष्ट्रवादीच्या भव्य-दिव्य कार्यालयाबाहेर शुकशुकाट दिसून आला.

धानोरी, वडगाव शेरी परिसराला पावसाने झोडपले; ठिकठिकाणी वाहतूक कोंडी

धानोरी/वडगाव शेरी । प्रतिनिधी

धानोरी, विश्रांतवाडी, वडगाव शेरी, खराडी परिसराला मंगळवारी जोरदार पूर्वमोसमी पावसाने झोडपले. रस्त्यांवर इतके पाणी साचले होते की, त्यामध्ये चारचाकी वाहने तरंगताना दिसून आली. ठिकठिकाणी घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांचे नुकसान झाले. पुणे शहरासह उपनगरांतही जोरदार पाऊस झाला. धानोरी परिसराला मंगळवारी सायंकाळी पाचच्या सुमारास पूर्व मौसमी पावसाने झोडपून काढले. परिसरातील मुख्य रस्त्यांसह अंतर्गत रस्त्यांना ओढ्या-नाल्यांचे स्वरूप आले होते. रस्त्यांवर दोन ते तीन फूट पाणी साठल्याने वाहनचालकांचे प्रचंड हाल झाले. धानोरी गावठाणातील दुकाने, घरे आणि सोसायट्यांत पाणी शिरल्याने व्यावसायिक व नागरिकांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले.

रस्त्यांवर ठिकठिकाणी पाणी तुंबल्याने प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. धानोरी, टिंगरेनगर, विद्यानगर, कलवड परिसरात पावसाने हैदोस घातला. पावसाचा जोर इतका प्रचंड होता की, वाहनचालकांना समोरचे दिसनेही अवघड झाले होते. धानोरी गावठाण परिसरातील रस्त्यांवर तीन फुटांहून अधिक पाणी होते. त्यामुळे अनेक ठिकाणी चारचाकी वाहने पाण्यावर तरंगताना दिसत होती. दुकानांमध्ये सुमारे पाच फूट पाणी साठले होते.

पाऊस सुरू झाल्यानंतर तासाभरातच धानोरी नाल्याला पूर आला. भैरवनगरचा नाल्याकडील भाग, श्रमिकनगर, विद्यानगर शेवटचा बसस्टॉप आदी परिसरातही रस्त्यांवर दोन ते तीन फूट पाणी साठल्याने वाहनचालकांची तारांबळ उडाली. रटिंगरेनगर व भैरवनगर यांना जोडणार्या पुलावरून पाणी वाहत होते. विश्रांतवाडी-फाईव्ह नाईन रस्त्यावर अनुप बेकरीजवळ मोठ्या प्रमाणात पाणी साठल्याने वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

वडगाव शेरी परिसरात मंगळवारी झालेल्या जोरदार पूर्व मोसमी पावसामुळे परिसरातील रस्ते जलमय झाले होते. ठिकठिकाणी पाणी साचल्याने वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र दिसून आले. तसेच काही नागरिकांच्या घरांमध्ये पाणी शिरल्याने त्याच्या संसारोपयोगी साहित्याचे नुकसान झाले. दरम्यान, महापालिका प्रशासनाने नाले सफाई केल्याचा दावा या पावसाने फोल ठरला आहे.या भागातील अरनॉल्ड शाळा, टेम्पो चौक, खराडीतील रिलायन्स मार्ट, तसेच नगर रोड, रामवाडी पोलिस चौकी, रामवाडी पेपल सेमिनरी, शास्त्रीनगर आदी ठिकाणी रस्त्यांवर पावसाचे पाणी साचल्याने वाहतूक कोंडी झाली होती.

अरनॉल्ड शाळा ते सनसिटीदरम्यान मोठ्या प्रमाणात वाहतूक कोंडी झाली होती. नगर रोड, कल्याणीनगर, वडगाव शेरी आणि खराडीतील अंतर्गत रस्त्यावर देखील वाहतुकीचा वेग मंदावल्याचे चित्र दिसून आले. सोपाननगर, हरिनगर, थिटे वस्ती, आपलं घर, जगदंबा सोसायटी, तसेच वडगाव शेरीतील काही नागरिकांच्या घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले. यामुळे नागरिकांच्या संसारोपयोगी साहित्याचे मोठे नुकसान झाले.

क्षेत्रीय कार्यालयाच्या तळघरात शिरले पाणी

येरवडा : येरवडा परिसरात मंगळवारी जोरदार पाऊस झाल्याने नागरिकांची तारांबळ उडली. रस्त्यांवर पाणी साचल्याने वाहतुकीचा वेग मंदावला होता. येरवडा क्षेत्रीय कार्यालयाच्या तळघरात पावसाचे पाणी शिरले. प्रशासनाने पावसाळापूर्व नाले सफाई केल्याच्या दावा या पावसामुळे फोल ठरल्याचे चित्र दिसून आले. जोरदार पावसामुळे ठिकठिकाणी पाणी साचल्याने वाहतूक कोंडी झाल्याचे चित्र दिसून आले. यामुळे वाहनचालक व नागरिकांची चांगलीच गैरसोय झाली. रस्त्यांवरील पावसाळी वाहिन्या तुंबल्याने रस्त्यावरून पाणी वाहत होते. प्रशासनाकडून परिसरात नाले, ड्रेनेज व पावसाळी वाहिन्यांची अद्यापही सफाई करण्यात आली नसल्याचे नागरिकांनी सांगितले.

धनकवडी परिसरात झाडे उन्मळली

धनकवडी : धनकवडी, आंबेगाव पठार, बालाजीनगर, भारती विद्यापीठ परिसरात वादळी वार्यासह जोरदार पाऊस झाला. धनकवडी परिसरातील राजमुद्रा सोसायटी, तसेच राऊत बाग परिसरातील काही घरांमध्ये पावसाचे पाणी शिरले. तसेच राजमुद्रा सोसायटीत दोन झाडे उन्मळून पडली. यात एक मोटारीचे नुकसान झाले. त्रिमूर्ती चौकाकडे जाणार्या रस्त्यावर पाणी साचल्याने वाहतूक कोंडी झाली होती. परिसरातील नागरिक व वाहनचालकांची या पावसामुळे चांगलीच तारांबळ उडाली.